MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक ८ / ऑगस्ट २०१९

## संपादकीय

### विकास मनुष्यबळाचा

काही वर्षांपूर्वी बेन गुरियन विद्यापीठाच्या निमंत्रणावरून मला इस्रायलला जाण्याची संधी मिळाली. त्या देशाने अल्पकाळात केलेली प्रगती पाहून मी थक्क झालो. फारशी सुपीक जमीन नसताना देखील हा देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. सिमा सुरक्षेच्या दृष्टीने या देशाने नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. अंतरिक्ष विज्ञानात या देशाने केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४८ साली इस्रायल निर्माण करण्यात आला. केवळ सहा-सात दशकांचा कालावधी त्यांना मिळाला. एव्हढ्या कमी कालावधीत विविध क्षेत्रांत या देशाने कशी काय प्रगती केली असावी? असा प्रश्न माझ्या मनात घोळू लागला. न राहवून मी माझ्या यजमान प्राध्यापिकेला (जिचे नाव डॉ. मिरियम अमीत आहे) प्रश्न केला, ''तुमच्या देशाने एवढ्या वेगाने कशी काय प्रगती केली?'' माझ्या प्रश्नाला तिने दिलेले उत्तर डोळ्यांत अंजन घालणारे होते. ते माझ्या मनात पक्के बसलेले आहे. ती म्हणाली, ''आमचा हा लहानसा देश, आमच्याकडे ना सुपीक जमीन, ना तेलसाठा; ना खनिजे, ना जंगल. नैसर्गिक साधनसंपत्तीचा आमच्या देशात अभाव असल्याने आमच्या मुलांनाच आम्ही आमची संपत्ती मानली आणि त्यांचा विकास करण्यावर आम्ही आमचे लक्ष केंद्रित केले. आज जी देशाची प्रगती तुम्ही पाहात आहात ते या मनुष्यबळ विकास प्रक्रियेचेच फलित आहे.'' प्राध्यापिका मिरियम अमीतने दिलेल्या लहानशा उत्तरात देशाच्या प्रगतीचे मर्म दडलेले आहे असे मला वाटते. इतिहासात झाकून पाहिले तर युरोपमधील फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड या देशांनी याच मार्गाने देशाची प्रगती साधली आहे. अलीकडच्या काळात सिंगापूर, जपान या देशांनी देखील याच मार्गाने आपली प्रगती साधली आहे असे आपल्या लक्षात येते. मनुष्यबळ विकास हा देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने एक परवलीचा वाक्प्रचार आहे.

इस्रायलमध्ये आलेल्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशाचा विचार करणे संयुक्तिक ठरेल. नव्या पिढीला शिक्षण देण्यासाठी आपल्या देशात विस्तृत अशी शिक्षण प्रणाली अस्तित्वात आहे. याचा ढाचा प्रामुख्याने आंग्ल राजवटीने निर्माण केला आहे. केवळ ढाचा त्यांचा घेतला असे नाही तर शिक्षणाचे माध्यम म्हणून देखील आपण त्यांचीच भाषा घेतली. काही काळापूर्वी केवळ उच्च शिक्षणासाठी इंग्रजी हे माध्यम म्हणून वापरले जात असे. अलीकडच्या काळात प्राथमिक शिक्षण देण्यासाठी देखील इंग्रजी माध्यमाचा वापर होऊ लागला आहे. खेडोपाडी

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**


इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळा काढल्या जात आहेत. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा ओस पडत चालल्या आहेत. या शाळा टिकवण्यासाठी काही स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रयत्नांना बळ देणे आवश्यक आहे. या शाळा टिकविणे हा या प्रयत्नांचा उद्देश नसून, मातृभाषेतून शिक्षण देणे हा उद्देश आहे. याचे कारण नवविचारांची निर्मिती मातृभाषेतून होते. जर्मनी, जपान, फ्रान्स ही त्याची ज्वलंत उदाहरणे आहेत. नव्याने निर्माण झालेल्या इस्रायल मध्ये देखील हाच विचार करण्यात आला. जगाच्या वेगवेगळ्या भागांतून लोक या देशात राहायला आले. त्या सर्वांना शालेय शिक्षण हिब्रू भाषेतून दिले जाते.

मध्यंतरीच्या काळात आपल्या देशात शिक्षण मंत्रालयाचे नामकरण आपण ''मनुष्यबळ विकास मंत्रालय'' असे केले. तरीही मनुष्यबळाचा विकास करण्याच्या दृष्टीने आपल्या देशात प्रयत्न होत आहेत असे मला वाटत नाही. आपले बरेचसे शिक्षण हे पुस्तकी ज्ञान देण्यावर आधारलेले आहे. या ज्ञानाच्या भरवशावर भारतीय तरुण आपल्या पायावर उभा राहू शकत नाही. तो नोकरीसाठी वणवण भटकत राहतो. त्यामुळे बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावर उपाय म्हणून व्यावसायिक शिक्षण देण्याची शक्कल लढवली गेली. अशा शिक्षणाची गरज ओळखून अनेक खाजगी संघटनांनी व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था काढल्या. यातील कित्येक संस्था प्रायोगिक कौशल्यापेक्षा माहितीलाच जास्त महत्त्व देतात असे दिसते. त्यामुळे या संस्थांमधून बाहेर पडणारे विद्यार्थी नोकरीच शोधू लागतात असे चित्र आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातून बाहेर पडणारे बहुतांश विद्यार्थी व्यवस्थापनाचे शिक्षण घेऊन व्यवस्थापक बनणेच पसंत करतात.

मनुष्यबळ विकास ही प्रत्येक देशाची निकड आहे. ही निकड तर आपल्या देशात जास्तच आहे. आधीच आपण अनेक वर्षे वाया घालविली आहेत. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी एक आराखडा तयार करण्याची गरज आहे. या आराखड्यावरून कोणती कौशल्ये असलेले मनुष्यबळ आपल्याला किती प्रमाणात आवश्यक आहे हे कळेल. त्यानुसार शिक्षण संस्थांची निर्मिती करावी लागेल. मनुष्यबळ विकास हे सरकारचे आणि समाजाचे आद्य कर्तव्य आहे. तिथे टाळाटाळ बिलकूल कामाची नाही. विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती काहीही असो. प्रत्येकाला शिक्षणाची समान संधी मिळणे आवश्यक आहे. असे झाले तरच गरीब आणि श्रीमंत यामधील आर्थिक दरी कमी होईल. नाहीतर आर्थिक विसंगतीचे हे नष्टचक्र असेच चालू राहील. त्याचबरोबर, मनुष्यबळ विकास म्हणजे नेमके काय ते समजून घेणे आवश्यक आहे. मुलामुलींना शाळा आणि महाविद्यालयांत प्रवेश दिला की मनुष्यबळ विकासाचा आपला उद्देश साध्य होईल असे म्हणणे धाडसाचे ठरेल. प्रत्येक भारतीय तरुणांचा सर्वांगीण विकास हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीत काही सुप्त गुण असतात. त्यांची योग्य ती दखल घेऊन त्यांच्या विकासाला योग्य ती संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. देशाचा विकास एकांगी होता कामा नये. विज्ञान, साहित्य, संगीत, नाट्य, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांत देशाची एकाच वेळेस प्रगती होणे आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी कर्तबगार आणि सर्जनशील तरुणांची आज देशाला गरज आहे. सुदैवाने भारतात तरुणांची संख्या मोठी आहे. त्यांना योग्य ती संधी मिळली तरच मनुष्यबळ विकासित होईल. नाहीतर बेरोजगारांची मोठी फळी निर्माण होईल. ते होऊ नये यासाठी विचारपूर्वक पावले टाकण्याची आणि पद्धतशीर प्रयत्न करण्याची गरज आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**




व्ही.पी.एम्.

# दिशा

## वर्ष विसावे/अंक ८/ऑगस्ट २०१९



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर



'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | कलम ३७० जाणे का गरजेचे होते ? | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ३ |
| ३) | विकासवेध-११: बोलणे लिहिणारी उपायोजने | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | ८ |
| ५) | चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ११ |
| ६) | एक खुले पत्र .....केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना | श्री. चन्द्रशेखर टिळक | १८ |
| ७) | श्रावण मास | डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी | २२ |
| ८) | मानसिक आजाराविषयीचा कलंक-एक सामाजिक समस्या | प्रा. डॉ. अनिल वर्तक | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# कलम ३७० जाणे का गरजेचे होते ?

*राज्यसभेमध्ये जम्मू आणि काश्मीरबाबत काही ऐतिहासिक घोषणा करण्यात आल्या. त्यानुसार कलम ३७० आणि कलम ३५ अ ही दोन कलमे निरर्थक बनवण्यात आली. त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरच्या पुनर्गठनाचे विधेयक मांडण्यात आले. त्यानुसार सध्याच्या जम्मू-काश्मीरचे विभाजन करुन लडाख आणि जम्मू-काश्मीर हे दोन्ही स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. कलम ३७० निरर्थक ठरवणे का गरजेचे होते हे जाणून घेण्यासाठी आपल्याला या कलमाचा इतिहास आणि गेल्या ७० वर्षांत त्या अनुषंगाने घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी लक्षात घ्याव्या लागतील. यावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख - संपादक*

जम्मूकाश्मीर हे संस्थान मुसलमान बहुल होते; पण तेथील राजा हरिसिंग हे हिंदू होते. भारतात विलिनीकरण करताना त्यांनी आपले संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र पाकिस्तानने आदिम टोळ्यांच्या मदतीने हरिसिंगांच्या संस्थानावर हल्ला केला. त्यानंतर हरिसिंगांनी भारताकडे मदत मागितली. त्यासाठी भारताने हे संस्थान भारतात विलीन करा तरच आम्ही मदत करू अशी अट घातली. हरिसिंग यांनी यास सशर्त संमती दर्शवली. त्यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करण्यासाठी कलम ३७० निर्माण झाले. त्यानंतर शेख अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत 'भारतीय प्रजासत्ताकामधील स्वतंत्र प्रजासत्ताक' असा काश्मीरचा उल्लेख केला होता. इतकेच नव्हे तर, काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांना पंतप्रधान संबोधले जाई!

### अस्थायी ३७० कलम

ह्या कलमासंदर्भात भारताच्या घटनासमितीत चर्चा सुरू होती त्यावेळी मद्रास प्रेसिडेन्सीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रामास्वामी अय्यंगर यांनी देखील ही गोष्ट स्पष्ट केली होती की, हे कलम पूर्णपणे अस्थायी स्वरूपाचे आहे. जम्मू-काश्मीरमध्ये स्वतंत्र घटनासमिती तयार करण्यात आली होती आणि ती असेपर्यंत एक अंतरिम सरकार तिथे अस्तित्वात होते. त्या अंतरिम सरकारचे प्रमुख शेख अब्दुल्ला होते. हे अंतरिम सरकार अस्तित्वात असेल, जोपर्यंत तिथे घटनासमिती अस्तित्वात असेल तोपर्यंतच कलम ३७० अस्तित्वात राहील आणि त्यानंतर ते आपोआप विसर्जित होईल. याचे कारण भारतीय राज्यघटनेतील कलम १ मधील (शेड्युल १) मध्ये १५व्या क्रमांकावर जम्मू-काश्मीरचा समावेश झाला आहे. त्यामध्ये जम्मू-काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे असे म्हटले आहे. जम्मू-काश्मीरची स्वतःची घटना असून त्यातील कलम ३ मध्येही याचा उल्लेख आहे. भारताची राज्यघटना अस्तित्वात आली त्याच वेळी जम्मू-काश्मीरची घटनाही अस्तित्वात आली. ज्या वेळी इन्स्ट्रुमेटशन ॲक्सेशन म्हणजेच विलिनीकरणाचा करार केला आणि जम्मू-काश्मीरच्या विधीमंडळाने त्याला मान्यता दिली त्यानंतरच कलम ३७० चे महत्त्व संपले होते. पण जम्मू-काश्मीरसाठी जी घटनासमिती निर्माण करण्यात आली तिने या कलमावर कोणताही निर्णय घेतला नाही. हे कलम ठेवायचे किंवा नाही याविषयी ते काही बोलले नाही. त्यामुळे कलम ३७० काढण्यासाठी या घटनासमितीची परवानगी आवश्यक ठरेल; पण घटनासमिती आता अस्तित्त्वात नसल्यामुळे आणि इन्स्ट्रुमेट ऑफ ॲक्सेशन अंमलात आल्यामुळे हे कलम संपुष्टात आले होते. त्यामुळे या कलमाबाबतचा निर्णय

घेण्याचा अधिकार हा पूर्णपणे भारतीय संसदेचा होता आणि संसदेने याबाबत आता निर्णय घेतला आहे.

**कलम ३७० मुळे टाकण्याबाबतची भूमिका आहे.**

**घटना समितीत चर्चा**

भारतीय राज्यघटनेत ३७० वे कलम समाविष्ट करताना घटनासमितीमध्ये मोठी चर्चा झाली होती आणि तेव्हाही याविषयी अनेक मतमतांतरे होती. ती इतकी तीव्र होती की, घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही काश्मीरला स्वतंत्र दर्जा दिला जाईल असे कोणतेही कलम भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत करण्यास स्पष्ट विरोध केला होता. परिणामी, या कलमाचे ड्राफ्टिंग कसे करावे हा प्रश्न उभा राहिला होता. त्यावेळी पंडित नेहरूंनी याचे ड्राफ्टिंग दुसऱ्या व्यक्तीकडून करून घेतले होते. डॉ. आंबेडकरांनी हे कलम लिहिलेले नव्हते, हे अनेकांना माहीत नाही.

या कलमाने जम्मू-काश्मीरला स्वतंत्र दर्जा देण्यात आला होता. भारतामध्ये सर्व निर्णय घेणारी यंत्रणा ही संसद आहे. पण सुरक्षा, परराष्ट्र व्यवहार आणि कम्युनिकेशन या तीन गोष्टी सोडल्या तर संसदेने बनवलेला अन्य कोणताही कायदा काश्मीरला लागू होत नाही जोपर्यंत काश्मीरची विधानसभा त्याला मान्यता देत नाही. दुसरा मुद्दा म्हणजे, संपूर्ण भारतात विधानसभेचा कार्यकाळ ५ वर्षांचा आहे; तर जम्मू-काश्मीरमध्ये हा कार्यकाल ६ वर्षांचा आहे. जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना दुहेरी नागरिकत्व आहे. सर्वांत मोठा मुद्दा म्हणजे, या कलमामुळे काश्मीरमध्ये इतर कुणालाही जमीन अथवा संपत्ती खरेदी करता येत नाही. इतकेच नव्हे तर, तिथे व्यवसाय करता येत नाही. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकारही तिथे लागू होत नाहीत. विधानसभा बरखास्तीचे नियम तिथे लागू होत नाहीत.

**कलम ३७० आणि काश्मीरमधील दहशतवाद**

स्थानिक तरुणांमध्ये हा जिहादी दहशतवादाचा विचार येण्यासही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कलम ३७० जबाबदार आहे. यासाठी एक उदाहरण पाहू या. १९९८ मध्ये भारतीय संसदेने एक कायदा मंजूर केला होता. त्यानुसार खासगी धार्मिक प्रार्थनास्थळांचा गैरवापर करण्यावर निर्बंध आणण्यात आले. धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी धार्मिक स्थळांचा वापर करता येणार नाही असे हा कायदा सांगतो. पण हा कायदा जम्मू-काश्मीरमध्ये लागू झाला नाही. परिणामी, आजही तिथल्या मशिदींतून मोठ्या प्रमाणावर जिहादचा नारा दिला जातो. तेथे भारतविरोधी घोषणा दिल्या जातात. तरुणांमध्ये जिहादची भावना वाढवण्यासाठी आवाहन केले जाते. तिथल्या काश्मीरी पंडितांना तिथून हाकलून लावण्याचे आवाहन केले जाते. थोडक्यात, एकप्रकारे असंतोष निर्माण करण्याचे काम धार्मिक स्थळांमधून होते आहे. त्यातून परात्मभाव वाढत गेला. दहशतवादाला खतपाणी मिळत गेले. इतकेच नव्हे तर, दहशतवाद विरोधी कायदा किंवा यंत्रणा विकसित केल्या जातात त्याही या राज्याला लागू पडत नव्हत्या. त्याचा गैरफायदा तिथल्या धार्मिक मूलतत्त्ववाद्यांनी आणि फुटिरतावाद्यांनी घेतला. दहशतवादाचा प्रसार वाढवण्यासाठी त्याचा वापर केला गेला. त्यामुळे जम्मू-काश्मीरमधील स्थानिक दहशतवादाला ३७० कलमच कारणीभूत असेल.

**३७० अपेक्षाभंग करणारे कलम**

भारतीय राज्यघटनेत कलम ३७० समाविष्ट झाल्यापासून आत्तापर्यंत गेल्या ७४ वर्षांच्या कालखंडात दोन गोष्टींच्या आधारावर या कलमाचा पुनर्विचार करणे आवश्यक होते. भारतीय राज्यघटनेत हे कलम समाविष्ट करण्यात आले त्यावेळी याबाबत काही अपेक्षा होत्या. पहिली अपेक्षा होती की, जम्मू-काश्मीरचे भारतीय संघराज्याबरोबर अधिकाधिक एकीकरण करायला हवे. तो मुख्य धारेत मिसळला जायला हवा. हे कलम समाविष्ट केल्याने तिथल्या लोकांचा, नागरिकांचा

---

आहात तोपर्यंत चार प्रेमाचे शब्द वापरा; तेच कामी येतील.

महिलांचा विकास व्हायला हवा. पण या दोन परिमाणांवर आधारित या कलमाचे परीक्षण केल्यास त्याचे उत्तर नकारात्मक येते.

### संसदेच्या सार्वभौम अधिकारावर मर्यादा

आतापर्यंत देशभरातील जवळपास १०० हून अधिक कायदे जम्मू-काश्मीरमध्ये लागू करता येत नव्हते. अगदी माहितीचा अधिकारसारखा कायदाही तेथे लागू होऊ शकत नव्हता. आज ७० वर्षांनंतरही तिथे पंचायत राज व्यवस्था नीटपणे लागू होऊ शकलेली नाही. अजूनही तळागाळातील लोकांचे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण होऊ शकलेले नाही. भारतीय संसदेने तयार केलेला कायदा जम्मू-काश्मीरमध्ये लागू करण्यासाठी तेथील विधानसभेकडून मान्यता घ्यावी लागायची. निवडणूक आयोगालाही जम्मू-काश्मीरमध्ये परवानगी नव्हती. सर्वोच्च न्यायालयालाही १९५०च्या दशकापर्यंत याबाबत निर्बंध घालण्यात आले होते. एवढेच नव्हे तर, १९५० पर्यंत त्या राज्यात प्रवेश करण्यासाठीही परवानगीची गरज लागत होती. या सर्वांचा परिणाम असा झाला की, देशपातळीवर सबंध देशवासियांसाठी लागू केलेले कायदे जम्मू-काश्मीरमधील नागरिकांसाठी लागू करता आले नाहीत. महिला कल्याणासाठीचे कायदे लागू होऊ शकलेले नाहीत. अशा १०० हून अधिक कायद्यांचा फायदा तेथील जनतेला झालाच नाही. परिणामी, तिथल्या जनतेचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होऊ शकले नाही.

### मानसिक विलिनीकरणातील अडथळा

कलम ३७० मुळे जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा मिळाला होता. त्यामुळे भारतीय नागरिकांपेक्षा आपण काहीतरी वेगळे आहोत ही भावना तिथल्या स्थानिकांमध्ये वाढीस लागली. त्यांच्यामध्ये परात्मभाव वाढीस लागला. ते स्वतःला वेगळे समजू लागले. थोडक्यात, भारतीय संघराज्याबरोबर त्यांचे एकीकरण झालेच नाही. उलट त्यांना स्वतंत्र अस्तित्व मिळाले आणि परात्मभाव वाढीस लागला आणि जम्मू-काश्मीरच्या विकासामधील, नागरिकांच्या सक्षमीकरणातील सर्वात मोठा अडथळा हा ३७० कलम ठरले. त्याचप्रमाणे त्या राज्याचे भारतीय संघराज्यामध्ये मानसिक विलिनीकरणही (सायकोलॉजिकल असिमिलेशन) झाले नाही.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी - ९७०२०३५८००

•••

### धुंद या आसमंतात आस तुझी लागते

मन रमवाया येशील केव्हा याची वाट पाहते
आठवणींच्या हिंदोळ्यावर एकटीच झुलत राहते
आठवण तुझी धुक्यासम येऊन त्यात हरवून मी जाते
नभ सारे एकत्र येता माझ्या एकटेपणाची जाणीव होते
मग सरी अशा बरसून येतात जणू काही त्यातून
माझेच मन व्यक्त होते...
नयनांतील अश्रूंचे थेंब नकळत गालावर ओघळतात
जणू काही पावसाचे टपोरे थेंब अलगद पानांवर
पडतात...
वीजा कडाडतात, पाऊस बरसतो...
वीजा कडाडतात, पाऊस बरसतो
भिजूनी सारे जाते...
मी मात्र न भिजताही तुझ्या आठवणींमध्येच
चिंब भिजूनी जाते...!

**- गौरी अंबाजी परब**
तृतीय वर्ष- बी.एम.एम.(पत्रकारिता)
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

# विकासवेध-११: बोलणे लिहिणारी उपायोजने

*बोललेले शब्द देवनागरीमध्ये लिहून काढणारी उपायोजने आता भ्रमणभाषसोबत उपलब्ध झाली आहेत. यांच्याबद्दलची माहिती या लेखात दिली आहे - संपादक*

१९९० च्या आसपास मुद्रित पाने चित्रांकित (स्कॅन) करण्याची सोय उपलब्ध झाली. विजकीयरित्या ती साठवून, लागेल तेव्हा आठवण्याची, त्यांचे मुद्रण करण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र तरीही त्यातून संपादनयोग्य मजकूर तयार करणे शक्य होत नव्हते. तसा जर करता आला तर काय काय लाभ होऊ शकतील ह्याबाबतची भाकिते केली जाऊ लागली. घरोघरी असलेली पुरातन पोथीपुराणे, असे तंत्र विकसित झाल्यास, अवचितच संपादन योग्य मजकुरात रूपांतरित होऊ शकणार होती. जुन्या, मौलिक कागदपत्रांच्या पुनरुज्जीवनाची तसेच बहुप्रतनिर्मितीकरता संपादन योग्य संहितासाधनाची सोय होऊ शकणार होती. मग जगभरात असंख्य लोक अशा तंत्राच्या शोधात तैनात केले गेले. त्या वैज्ञानिक मंथनातून एक आगळेच नवनीत मग पुढे आले.

प्रकाशकीय अक्षर ओळख (ऑप्टिकल कॅरॅक्टर रेकग्निशन) नावाचे नवीनच तंत्र उदयास आले. जे चित्रांकित मुद्रित पानांवरील मूळ मजकूर ओळखून संपादनयोग्य संहिता तयार करून देऊ शके. जरी सुरुवातीस ते इंग्रजी भाषा आणि रोमन लिपीकरता तयार करण्यात आलेले होते तरी इतर भाषा आणि लिपींकरता त्यात उत्तेजित करणाऱ्या संभावना दडलेल्या होत्या. अगदी सुरुवातीस मूळ मजकूर आणि पुनर्रचित मजकुरांत खूपच तफावत असे, त्रुटी असत. जसजशा हे कार्य करणाऱ्या संगणक प्रणाली अष्टपैलू आणि समर्थ होत गेल्या तसतशा त्या त्रुटी कमी होत गेल्या. इंग्रजी भाषा आणि रोमन लिपीकरता तर त्या नगण्य झाल्या. मुद्रित पानांवरील मूळ मजकूर ओळखून संपादन योग्य संहिता तयार करू शकण्याचे स्वप्न साकार झाले. एवढेच नव्हे तर हे सारे स्वयंचलित पद्धतीने होऊ शकत असल्याने ही प्रक्रिया अत्यंत गतीमान झाली. स्वस्त झाली. मुद्रित पानांवरील मूळ मजकूराची संपादन योग्य पुनर्रचना करण्यासाठी मानवी प्रयासांना लागणाऱ्या वेळ आणि परिश्रमाच्या अगदीच छोट्याशा अंशात हे साध्य झाले.




तरीही मुद्रित मजकूर वाचून त्याचे ध्वनिमुद्रणही अल्पकाळात साध्य होतेच. अशा श्राव्य मजकुरातून लिखित संहिता तयार करता येऊ शकेल का? ह्या दिशेनेही संगणकशास्त्र, विजकविद्या (इलेक्ट्रॉनिक्स), श्रुतबोधाचे लिखाण करण्याचे तंत्र प्रगती करू लागले. भ्रमणध्वनी (मोबाईल) साधनांच्या विकास आणि सर्वव्यापी क्रांतीमध्ये, ह्यातील श्रुतबोधाचे लिखाण करण्याचे तंत्र कळसास पोहोचले. मग तुम्ही मराठी बोला, भ्रमणध्वनी टंकलेखन करेल अशा जाहिराती दिसू लागल्या. प्रकाशकीय अक्षर ओळख तंत्रावर,

श्रुतबोधाचे लिखाण करण्याचे तंत्राने मात केली. ऐकलेला मजकूर जवळपास शब्दशः, विनासायास आणि विनाविलंब लिहिता येऊ लागला. ह्याचे दुसरे एक पर्यवसान भाषांतरणांवर आणि लिप्यंतरणांवरही झाले. ह्या दोहोंना ही क्रांती पोषकच ठरली. भाषांतर म्हणजे अनुवाद. हे काम आज तरी मानवी प्रयासांनीच शक्य आहे. रोमन लिपीत लिहिलेले इंग्रजी देवनागरीत लिहिणे, हे झाले लिप्यंतरण. हे मात्र हल्ली काही अंशी यंत्रांकरवी शक्य झालेले आहे.

श्रुतबोधाचे लिखाण यशस्वी झाल्यावर भ्रमणध्वनीसंचांवर ते करून देणारी उपायोजने उपलब्ध होऊ लागली. आजमितीला तशी अनेक उपायोजने उपलब्ध झालेली आहेत.

पेशाने वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या विख्यात व्यक्ती अत्यंत व्यस्त असतात. निदानाचा मजकूर लिहवून घेण्यासही त्यांना वेळ नसतो. अशा स्थितीत मग वैद्यकीय श्रुतबोधलेखनाचा (मेडिकल ट्रान्स्क्रिप्शनचा) व्यवसायही बहरात आला. तरीही लेखन केल्यानंतर वैद्याने स्वतः ते लिखाण पाहून त्याची अचूकता तपासण्याची गरजही निर्माण झाली. भ्रमणध्वनी संचांवर श्रुतबोधाचे लिखाण यशस्वी झाल्यावर मग वैद्य (डॉक्टर) स्वतःच बोलू लागले आणि त्यांचे भ्रमणध्वनीसंच ते लिहून घेऊ लागले. त्यात काही उणीवा राहिल्यास त्या दुरुस्त करण्याच्या संचांतर्गत सुविधांमुळे ती निदाने मग पुन्हा तपासण्याची, दुरुस्त करण्याची आवश्यकताच राहिली नाही.

आज हे तंत्र अगदीच बाल्यावस्थेत आहे. ते बहरात येईल तेव्हा त्याचे अनेकानेक उपयोग पुढे येतील. कोणत्याही भाषेच्या कोणत्याही लिपीतील कोणतेही अक्षर ब्रेल लिपीत रूपांतरित करणारी यंत्रे आज विकसित झालेली आहेतच. त्यांच्या संयोगाने ह्या तंत्राचे आधारे,




आपण जगातील प्रायः कोणत्याही मजकुराचे ब्रेल लिपीत रूपांतर करू शकतो. ह्याचा उपयोग निश्चितपणे अंध व्यक्तींच्या विकासास गती लाभण्यात होणार आहे.

अत्यंत विद्वान व्यक्तीचा किंचितही वेळ आणि एकही शब्द वाया जाऊ न देता त्यांचा सल्ला लिखीत आणि अंकित (डिजिटाईझ्ड) करता येणे ह्या तंत्रामुळे शक्य झालेले आहे. मानवी अनुभवांतरणाच्या इतिहासातील हे एक खूप महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. मानवी अनुभवांच्या लेखनाला ह्यामुळे अपूर्व अशी गती लाभणार आहे. मात्र लिखित अनुभवांचे पर्वत तयार झाल्यामुळे, हवा तो अनुभव शोधून वाचणाऱ्याला डोंगर पोखरून काढावे लागणार आहेत. अनावश्यक, अर्थहीन अनुभवांच्या लेखनांचे ढिगारे हटवता हटवता आपण सारेच टेकीस येणार आहोत. चला तर होऊ या सज्ज ढिगाऱ्यांतून सार्थ अनुभवांची भांडारे हुडकण्याकरता!

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था
(भाग–६)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

''महामार्ग विशालं यद्वीथीनन्दसमं तु वा ।।१०१।।

महारथ्यासमं मध्ये वीथिविस्तारमिष्यते ।
मध्ये (वीथी) समं तु मध्येच मार्गमेवं विशालकम् ।।१०२।।

तदष्टांशोनमेवं वा त्रिपादमर्धमेव वा ।
अन्यासां सर्ववीथीनां यथा तत्सममेव च ।।१०३।।

महामार्गाची रुंदी नऊ दण्ड असावी. इतर मध्यम मार्गाची रुंदी नगराच्या मध्यभागांत असलेल्या रस्त्याच्या रुंदीइतकी किंवा त्यापेक्षा १/८ किंवा १/२ पेक्षा कमी असली तरी चालेल.

''तत्समं (सर्वासां) वा त्रिपादं वा महामार्गविशालकम् ।
तत्त्रिपादार्धं तु विस्तारं क्षुद्रमार्गविशालकम् ।।१०४।।

महामार्गाची रुंदी (जरुरी नसल्यास, जागा नसल्यास, शेतीचे नुकसान होण्याची शक्यता असल्यास) इतर मध्यभागातल्या रस्त्यांच्या रुंदीइतकी असावी. कमी महत्त्वाच्या रस्त्यांची (गल्ली, बोळ) रुंदी महामार्गाच्या रुंदीच्या ३/४ किंवा १/२–निम्मी असली तरी चालेल.

दैवमनुषं तु पैशाचे भूसुरान् परिपूर्णकम् ।
एवं मङ्गलाख्यातं यस्तु वास्तुं विनिर्दिशेत् ।।१०७।।

जे कोणी तज्ज्ञ या नगरांच्या निर्मितीची योजना करतील, त्यांनी या नगरांत, देवता, विप्रतर जातींचे लोक आणि विप्र या सर्वांमध्ये विप्रजन बहुसंख्य असतील, तर अशा वस्तीस मंगल असे संबोधावे.

''नृपवैश्यादिजातीनामेवं चेत् पुरमुच्यते ।१०७१/२''

जेव्हा राजे (क्षत्रिय), वाणी आणि इतर जमातींचे लोक एकत्र रहातात, तेव्हां त्या नगराला 'पुर' असे म्हटले जाते.

''वैश्यशूद्रादीनां योग्यमग्रहारं प्रशस्यते ।।१०८''

ज्या गावांत वाणी सेवकवर्ग व इतर जाती रहातात, त्या गावांला अग्रहारफ्र असे संबोधले जाते.

''बहिश्च सर्वरथ्यासु पक्षैरावर्तकासु च ।।१६१''

गांवातील आणि गांवाबाहेरील सर्व (महत्त्वाच्या) रस्त्यांना पादचारी मार्ग असावेत.

''एवं तु पद्मविन्यासं शेषं प्रागुक्तवन्नयेत्'' ।

वरील वर्णन 'पद्म' ग्रामासंदर्भात आहे. त्यांतील इतर सोयी सुविधा पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे असाव्यात.

''स्वस्तिकसयापि विन्यासलक्षणं वक्ष्यतेऽधुना'' ।।१६३।।

आता 'स्वस्तिक' नगराची रचना आणि त्यांतील इतर सुविधा यांचे वर्णन करीत आहे.

'यत्तदायामविस्तारे न्यशेत्परमशायिकम्' ।।१६३१/२

याची लांबी आणि रुंदी 'परमशायिक' पद्धतीने करावी. (नगराच्या मध्यभागांत नऊ भूखंड असावेत. ते ब्रह्म या नावाने ओळखले जातात. बाहेरच्या भागांत २४ भूखंड असावेत. ते दैवक या नावाने ओळखले

जातात. आणि त्यांच्या पलिकडे २४ भूखंड असावेत. ते परमाशायिक या नावाने ओळखले जातात.)

तत्पैशाचपदे चैव रथ्यातत्परितस्तथा ।।१६४।।

शेवटच्च्या भागांत नगराला वळसे घालणारे मोठे रस्ते (रथवाहतुकीसाठी) असावेत.

तस्यान्तः स्वस्तिकाकारं विन्यसेच्छिल्पिवित्तमः ।

तज्ज्ञ वास्तुशास्त्रज्ञाने अशा नगराची अंतर्गत रचना स्वस्तिकाच्या आकाराची करावी.

**नवमोडध्यायः । अध्याय नववा**

प्रास्प्रत्यक्‍ च समायामं वास्तुमध्ये तु वीथिका ।।१६५।।

दक्षिणोत्तरमायामं पूर्वमध्ये तु वीथिका ।
वीथी एतद् द्वयं प्रोक्तं तन्मध्ये कर्करीकृतम् ।।१६६

नगराच्या मध्यभागातून पूर्वेकडून पश्चिमेकडे एक रस्ता आणि दुसरा दक्षिणेकडून उत्तरेकडे जाण्यासाठी केला जावा. दोन्ही रस्ते रस्त्याच्या मध्यभागात एकमेकांना छेदून जातील असे  असावेत. सर्व रस्ते चुनखडीने पक्के केले जावेत.

उदीच्यां दिशिपर्यन्तं प्राङ्मुखायतवीथिका ।
प्राग्दिशाग्निपर्यन्तं दक्षिणायतवीथिका ।।१६७।।

दक्षिणांदिक् नैऋतान्तं पश्चिमायतवीथिका ।
पश्चिमाद्वायुपयन्तं उत्तरायतवीथिका ।।१६८।।

पूर्वेकडे जाणारा रस्ता उत्तरेकडून ईशान्येकडे जाईल असा करावा. दक्षिणेकडे जाणारा रस्ता, पूर्व भागांतून अग्नेय भागाकडे नेण्यात यावा. पश्चिमेकडे जाणारा रस्ता पश्चिमेकडून नैऋत्य भागापर्यंत वाढवावा आणि उत्तरेकडे जाणारा रस्ता पश्चिम भागाकडून वायव्य भागातील प्रदेशापर्यंत नेण्यात यावा.

एतत्तु चतुरथ्याग्रावृता वीथिका ततः ।
एवं स्वस्थिकवीथी लाङगलाकारवद् भवेत् ।।१६९।।

त्यानंतर या चारही रस्त्यांच्या शेवटास मिळतील अशा तऱ्हेने सर्व रस्त्यांना वळसा घालणारा रस्ता करावा. अशा तऱ्हेने ‘स्वस्तिक’ रस्त्याची रचना करावी. त्याचा आकार नांगरासारखा असावा.

मध्ये वीथी द्वयोरग्रे तस्य मूलद्वये बुधैः
चतुर्दिक्षु चतुष्कर्णे चतुर्दिक्षु चतुर्मुखम् ।।१७०।।

जाणकार व्यक्तींच्या मताप्रमाणे रस्त्याच्या मध्यभागाला भिडतील अशा तऱ्हेने दोन रस्ते असावेत आणि दोन रस्ते नगराच्या उत्तरेस आणि दोन रस्ते नगराच्या दक्षिणेस अशा पद्धतीने करावेत की नगराच्या चारही दिशांना जाता यावे. यव रस्त्याच्या मध्यभागाकडे पण जाता येईल. अशा पद्धतीने चारही दिशांकडे जाणारे रस्ते असावेत.

इन्द्रादीशानपर्यन्तं मध्यं सोमावानकम् ।।१७१।।
तत्तयोर्मध्यदेशे तु प्राक्प्रत्यक् दिग्गयातम् ।।१७११/२

उत्तर-पश्चिम भागाच्या मध्यभागातून पूर्व-पश्चिम असा रस्ता करावा.

बाह्येन्द्रालयाग्येतु तद्द्वयोर्मध्यदेशके ।।१७२।।
दक्षिणोत्तरयोर्वीथी वीथिरेतत्प्रकल्पयेत् ।।१७३।।

दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारा रस्ता दोन्ही दिशांच्या रस्त्याच्या मध्यभागातून पूर्वेकडे आणि आग्नेयेकडून दक्षिणेकडे जाईल असा करावा.

बाह्यां याम्याश्च नैऋत्य वारुणान्तः प्रदेशकम् ।।१७३।।

पूर्वपश्चिमदीर्घा च वीथिरेवं तु कारयेत् ।

पश्चिम भागाच्या मध्यातून पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा रस्ता करावा.

वायुवारणसोमे यतु ब्रह्मणान्तं पदे तथा ।।१७४

दक्षिणोत्तररथ्यं च तत्संख्या च यथेष्टकम् ।

(उत्तर पश्चिम प्रदेशाच्या मध्यभागातून) एक रस्ता दक्षिणोत्तर असा करावा.

एवं वीथी द्विपक्षं स्यान्मध्यरथ्ये न पक्षकम् ।।१७५।।

तस्य तु मूलाग्रयोर्देशे क्षुद्रमानं प्रकारयेत् ।
बाह्यवीथी द्विपक्षं स्यात्तद्वहिश्चवृतं बुधैः ।।१७६।।

या वर उल्लेखिलेल्या रस्त्यांना दोन पादचारी पथ असावेत. परंतु मध्यभागातील रस्त्यांना मात्र पादचारी पथ नसावेत. (कारण तो वाहनांसाठी रथ, घोडे, हत्ती, उंट - यांसाठी राखीव असतो.) या रस्त्यांची रुंदी त्यांच्या दोन्ही शेवटास कमी करीत जावी. नगराला वळसा घालणाऱ्या रस्त्याला पण दोन पदपथ असावेत. जाणकारांच्या मते या वळसा घालणाऱ्या रस्त्याला (त्याच्या बाहेरच्या बाजूने संरक्षक) तटबंदी असावी.

अथवा तन्महापीठे तत्र संयुक्तवीथिका
पूवपश्चिममायामं दक्षिणोत्तरदीदर्घकम् ।।२१२

तन्मध्ये वैकवीथी स्यात्पैशचाख्ये पदे बुधः
कृत्वा पीठपदे चैकां मध्ये वीथीं न कारयेत् ।।२१३

'पैशाच' भागात वास्तुशास्त्रज्ञाने एक रस्ता पूर्वेकडून पश्चिमेकडे जाईल आणि दुसरा रस्ता दक्षिणेकडून उत्तरेकडे जाईल अशी योजना करावी. गावांत जेथे '(व्यास-) पीठ' आहे तेथे जाण्यासाठी एकच रस्ता असावा. परंतु पीठाच्या जागेपासून मात्र चारही दिशांना जाणारे रस्ते असावेत.

पूर्ववद्दिक्षु चायामं द्विद्विरथ्यां प्रकल्पयेत् । महापीठपदे रथ्या दिक्षु दिक्षुमयं तथा ।।

महापीठाची स्थापना ज्या ठिकाणी झाली आहे त्या ठिकाणापासून दोन रस्ते पूर्व-पश्चिम व दोन रस्ते दक्षिण-उत्तर अशा मार्गाने जातील असे करावेत.

'तेषामेव महारथ्यास्तस्मिन्विस्तारमुच्यते म'

नगरातील रस्त्यांच्या रुंदीची परिमाणे खाली निर्दीष्ट केल्याप्रमाणे -

'षट्सप्ताष्टदंडं वा नन्दनाटकरुद्रम् ।।२१५'

ही रुंदी सहा दण्ड, सात दण्ड, आठ दण्ड, नऊ दण्ड (नन्द), दहा दण्ड (नाटक-दशावतार) किंवा अकरा दण्डसुद्धा (रूद्र=एकादश रूद्र) ठेवता येइल.

''एतत्सर्वं वीथिविस्तारः परिकीर्तितः ।
यत्पदे तत्पदं ज्ञात्वा तत्तत्प्रत्येककं पदे ।।२१६।।

पुराकृतं पदं न्यस्य रथ्यान्तं परिकल्पयेत् ।
तत्पैशाचपदे देशे वावृता वीथिका भवेत् ।।२१७।।''

याप्रमाणे रस्त्यांच्या योजनेबद्दलचे वर्णन झाले. वेगवेगळ्या क्षेत्रांचे भूखंड ठरवले जावेत. त्याप्रमाणे भूखंड रेखांकित करून रस्ते कुठपर्यंत नेता येतील ते ठरवावे.

तद्रथ्यान्तः प्रदेशे तु प्रागुदगायते तथा ।।
त्रिपञ्चसप्तरथ्या वा चाष्टमं च बंधं भवेत् ।।२१८।।

या 'पैशाच' भागांत त्याच्या सभोवारच्या परिसरातल्या अंतर्भागात जाण्यासाठी रस्ते असावेत. यासाठी तीन, पाच किंवा सात रस्ते पूर्वेकडे आणि उत्तरेकडे असावेत. त्या प्रत्येक रस्त्याच्या दोन्ही बाजूस आठ भूखंड असावेत. अशा रस्त्यांना किंचित वळण असले तरी चालेल.

(क्रमशः)

**- मधुकर गजानन दातार**

●●●

# चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी
## (भाग - १)

*चीनचे परराष्ट्र धोरण व त्याचा भारतावरील विपरीत परिणाम याचे विवेचन करणारा लेख - संपादक*

स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंतचे भारताचे परराष्ट्र धोरण पाहिल्यावर आपल्या असे लक्षात येते की, आपल्या परराष्ट्र धोरणात एकंदरीतच आजपावेतो अनेक चढ-उतार आलेले आहेत. एवढेच नव्हे तर, स्वातंत्र्योत्तर काळापासून ते सद्यस्थितीपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणात अनेक स्थित्यंतरे झालेली आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताने सुरुवातीपासूनच आपल्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून स्वतःचे स्वतंत्र स्थान व कणखर भूमिका अबाधित ठेवलेली असल्याचे आपल्या निदर्शनास येते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा जागतिक पातळीवर अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये 'शीतयुद्ध' सुरू होते. दुसरे महायुद्ध १९४५ साली संपले व त्यापाठोपाठ लागलीच शीतयुद्धाची सुरुवात झाली. साधारणतः १९४१ ते १९४५ या काळात अमेरिका व सोव्हिएत संघ ही राष्ट्रे खांद्याला खांदा लावून आपल्या संयुक्त शत्रूविरुद्ध म्हणजेच हिटलरच्या अधिपत्याखालील जर्मनीविरुद्ध लढत होती. मात्र, १९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्याबरोबर या राष्ट्रांमधील मैत्री व सौहार्दपूर्ण संबंध संपुष्टात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर ही दोन बलाढ्य राष्ट्रे एकमेकांसमोर प्रतिस्पर्धी म्हणून उभी ठाकली व त्याची परिणती शीतयुद्धात झाली. शीतयुद्धाला कारणीभूत मुख्य कारण म्हणजे सोव्हिएत संघाने पूर्व युरोपातून सैन्य मागे न घेता तेथे प्रस्थापित केलेली साम्यवादी सरकारे व त्याचप्रमाणे जगात जमेल तेथे साम्यवादाचा प्रसार करण्याचा लावलेला सपाटा हे होय. सोव्हिएत संघातील साम्यवादी राजवट टिकवायची असेल तर सोव्हिएत संघाच्या शेजारी साम्यवादी राजवट असणाऱ्या देशांची संरक्षक फळी असावयास हवी असे सोव्हिएत संघातील तत्कालीन नेत्यांना वाटत होते. अमेरिकेला नेमके हेच मान्य नव्हते.

त्यामुळेच दुसरे महायुद्ध संपल्यावर पूर्व युरोपातील अनेक देशांमध्ये सोव्हिएत संघाने साम्यवादी राजवटी निर्माण केल्यानंतर जेव्हा ग्रीस या देशात तेथील स्थानिक साम्यवाद्यांना खतपाणी घालून तेथेदेखील साम्यवादी राजवट स्थापन करण्याचा प्रयत्न केला गेला तेव्हा मात्र अमेरिकेने पूर्ण ताकदीनिशी रशियाच्या या प्रयत्नांना खीळ घालण्याचे नव्हे, तर हे प्रयत्न हाणून पाडण्याचे ठरविले. यातूनच हॅरी ट्रुमन यांनी (अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष) आपले 'ट्रुमन डॉक्ट्रीन' (Truman Doctrine) हे जगप्रसिद्ध धोरण जाहीर केले. या धोरणानुसार अमेरिकने रशियाला उघड-उघडपणे इशारा दिला की, जर रशियाने जगातील विविध देशांमध्ये तेथील लोकांच्या मर्जीविरुद्ध त्यांना नको असलेली (येथे वाचकांनी 'साम्यवादी' असे वाचावे) राजवट प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिका बघ्याची भूमिका घेणार नाही. 'ट्रुमन डॉक्ट्रीन'ने खऱ्या अर्थाने जगात शीतयुद्धाची सुरुवात झाली असल्याची जाणीव करून दिली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

जगात अशातऱ्हेने दोन महासत्तांमध्ये शीतयुद्धाची सुरुवात झाल्यानंतर जगातील अनेक देश अमेरिका वा रशिया यांचे अनुयायी बनले. एका अर्थाने अमेरिका व रशिया या दोन महासत्तांच्या अनुयायांचे दोन गट पडले. अशा परिस्थितीत भारताने मात्र या दोन महासत्तांच्या

एखादी वस्तू वापरली नाही की ती गंजते आणि जास्त वापरली तर झिजते. काहीही झालं तरी शेवट तर ठरलेलाच आहे, मग कोणाच्याही उपयोगात न येता गंजण्यापेक्षा इतरांच्या सुखासाठी झिजणे केव्हाही उत्तमच!

जागतिक राजकारणात न पडता अल्पिततावादाची स्वतंत्र वाट चोखाळली. या काळात भारताने अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमधील शीतयुद्धाच्या राजकारणापासून स्वतःस प्रकर्षाने दूर ठेवले. याचे कारण म्हणजे, भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांची अशी भूमिका होती की, जर भारत या दोन महासत्तांच्या राजकारणात पडला तर भारताची ससेहोलपट होईल. त्याचप्रमाणे या महासत्तांचे अनुयायी म्हणून अनुकरण करत बसल्यास भारताच्या अंतर्गत समस्या सोडविण्याकडे दुर्लक्ष होऊन भारताची खऱ्या अर्थाने आर्थिक व वैज्ञानिक प्रगती साध्य करण्याकडे दुर्लक्ष होईल. आपला शेजारी पाकिस्तान मात्र अमेरिकेच्या गटात जाऊन सामील झाला. भारतानेसुद्धा शीतयुद्धात सरळ-सरळ सहभाग घेतला नसला तरी नंतरच्या काळात आपला पूर्वेकडचा शेजारी साम्यवादी चीनने निर्माण केलेल्या समस्यांमुळे रशियासोबत मैत्रीकरार करण्याचा निर्णय घेतला. असे असले तरी, भारताने ठामपणे स्वतःला अमेरिका वा रशिया यांचा अनुयायी (निदान शीतयुद्धापुरते तरी) नसल्याचे वेळो-वेळी सांगितले व भारत अल्पिततावादी चळवळीचा एक प्रमुख आधारस्तंभ बनला. भारत व रशियामधील मैत्रीदेखील एकमेकांना समान दर्जा व मान देऊन करण्यात आली होती. अशाप्रकारे भारताने शीतयुद्धासारख्या कठीण काळात देखील आपल्या स्वाभिमानी परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख अबाधित ठेवली.

भारताने सुरुवातीपासूनच आपल्या नजीकच्या शेजारी राष्ट्रांसोबतदेखील सलोख्याचे व मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचे प्रयत्न केले आहेत, नव्हे ठेवले आहेत. भारताने स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच आपल्या सर्व शेजारी राष्ट्रांशी सौहार्दपूर्ण संबंध जोपासण्याचा सततपणे प्रयत्न केला आहे. भारताचे सुरुवातीपासूनच नेपाळ, श्रीलंका, मालदीव इत्यादी शेजारी राष्ट्रांशी चांगले संबंध राहिलेले आहेत. भारत दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश असला तरी, भारताने आसपासच्या शेजारील राष्ट्रांना कधीच त्रास दिला नाही. उलट भारताने मोठ्या भावाप्रमाणे या राष्ट्रांना वेळोवेळी मदत करून त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर सततपणे मदत करण्याचाच प्रयत्न केला. नेपाळसारख्या चिमुकल्या देशाची तर संपूर्ण अर्थव्यवस्थाच भारतावर विसंबून आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. दरवर्षी लाखो नेपाळी लोक भारतात येऊन आपला उदरनिर्वाह करत असतात व आपल्या मायदेशी पैसा पाठवत असतात. अनेक नेपाळी लोक तर भारतात कायमस्वरूपी स्थायिक होतात नव्हे, झालेले आहेत. भारताने व भारतीयांनी या नेपाळी बांधवांना कधीही सापत्न वागणूक दिली नाही की त्यांना त्रास दिला नाही. नेपाळहून कुठलीही व्यक्ती भारतात विनासायास कुठल्याही आंतरराष्ट्रीय बंधनांशिवाय भारतात येऊ शकते. यावरून भारत आपल्या शेजारी असलेल्या छोट्या राष्ट्रांना निव्वळ चांगली वागणूकच देत नाही तर त्यांना मदत देखील करतो हे सिद्ध होते.

एका गोष्टीचे मात्र वाईट वाटते व ते हे की, भारताने प्रयत्न करून देखील भारताचे पाकिस्तानसोबत कायमस्वरूपी चांगले संबंध आजपावेतो प्रस्थापित होऊ शकलेले नाहीत. याला कारणीभूत पाकिस्तानच आहे यात काहीच वाद नाही.

भारताच्या शेजारील राष्ट्रांपैकी पाकिस्तानने नेहमीच भारताला त्रास दिलेला आहे. १५ ऑगस्ट १९४७ साली आपणास ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. मात्र, सोबतच आपल्या देशाची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान हे दोन देश निर्माण झाले. मुळात पाकिस्तानची निर्मितीच धार्मिक तत्त्वावर झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच मुस्लीम लीगने व त्यांच्या बॅरिस्टर जिन्नाह या नेत्याने धर्माच्या तत्त्वावर वेगळा पाकिस्तान निर्माण करण्याचा तगादा लावला होता. शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश आले व भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश निर्माण

झाले. मात्र, पाकिस्तान हा अखंड स्वरूपात अस्तित्वात न येता पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान अशा दोन भागांच्या स्वरूपात अस्तित्वात आला. नंतरच्या काळात १९७१ च्या भारत-पाक युद्धानंतर पूर्व पाकिस्तान पश्चिम पाकिस्तानापासून वेगळा झाला व बांगलादेश या नावाने ओळखण्यात येऊ लागला. हा इतिहास तर सर्वज्ञातच आहे. असो. आपला येथे मुख्य मुद्दा असा होता की, पाकिस्तानने तो वेगळा देश म्हणून निर्माण झाल्यावर सुरुवातीपासूनच भारताला त्रास देण्यास सुरुवात केली होती. पाकिस्तानने १९४७ सालापासूनच जम्मू व काश्मीर या प्रांतात हस्तक्षेप करून तेथे दहशतवादी कारवाया करण्याचा उपद्व्याप चालवला असल्याचे निदर्शनास येते. आजतागायत, पाकिस्तान जम्मू-काश्मीरमध्ये घातपाताच्या कारवाया करण्यात मग्न आहे. झिया-उल-हक यांच्या काळापासून तर पाकिस्तानने काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांना खतपाणी घालण्याचे व पाकिस्तानच्या भूमीतून काश्मीरमध्ये आतंकवादी पाठविण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात करण्यास सुरुवात केली.

१९४७-४८ साली जेव्हा पाकिस्तानने काही पठाणी टोळ्यांना जम्मू-काश्मीरवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले व त्यात पाकिस्तानी लष्कराने देखील हिरीरीने सहभाग घेतला तेव्हा जम्मू-काश्मीर संस्थानचा राजा हरिसिंग याने जम्मू-काश्मीर हे संस्थान भारतात विलीन केले. त्यानंतर भारताने पठाणी टोळ्या व पाकिस्तानी लष्करावर कारवाई केली. परंतु तोपर्यंत जम्मू-काश्मीरचा पश्चिमेकडचा बराचसा भाग पाकिस्तानने गिळंकृत केला होता. या पार्श्वभूमीवर काश्मीरची समस्या संयुक्त राष्ट्रसंघात पोहोचली व संयुक्त राष्ट्राने 'जैसे थे' ही स्थिती राखण्यासाठी सांगितल्यामुळे काश्मीरचा पश्चिमेकडील भाग पाकिस्तानच्या ताब्यात असून हा भाग गिलगिट-बल्टिस्तान व पाकव्याप्त काश्मिर म्हणून ओळखला जातो. पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरला आझाद काश्मीर (म्हणजेच स्वतंत्र काश्मीर) म्हणणे पसंत करते. येथे एक महत्त्वाची बाब नमूद करणे आवश्यक आहे व ती ही की, पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरचे दोन प्रदेशांत विभाजन केलेले असून या प्रदेशांना पाकिस्तान 'गिलगिट बाल्टिस्तान' व 'आझाद काश्मीर' असे म्हणते. परंतु भारताच्या दृष्टीने हा सर्व प्रदेश पाकव्याप्त काश्मीरच आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भारत व पाकिस्तान दरम्यानचे संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिलेले आहेत. असे असूनसुद्धा भारताने सततपणे सबूरीची भूमिका घेऊन पाकिस्तानसोबतचे वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्याचे प्रयत्न केलेले आहेत. पाकिस्तान मात्र, अगोदर म्हटल्याप्रमाणे काश्मीर व भारताच्या इतर भागांत देखील दहशतवादी कारवाया करताना दिसतो. गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तान व चीनचे संबंध दृढ होत चालले आहेत व त्यामुळे पाकिस्तान अजूनच जास्त प्रमाणात निर्ढावला गेलेला असून भारताला त्रास देण्याची एकही संधी सोडत नाही असे निदर्शनास येते.

चीनदेखील जाणून-बुजून पाकिस्तानला फार मोठ्या प्रमाणात आर्थिक तसेच शस्त्रांची मदत देताना दिसतो. याचे कारण म्हणजे चीन भारताला आपला मोठा स्पर्धक मानतो व त्यामुळे पाकिस्तानला भारतविरोधी कारवाया करण्यासाठी सढळ हस्ते मदत करताना व भरीस घालताना आढळतो.

चीनने भारताच्या काश्मीरमधील 'अक्साई चीन' या क्षेत्रावर अनधिकृतरित्या ताबा मिळविलेला असून तेथून त्यांनी चीन व पाकिस्तानला (म्हणजेच पाकव्याप्त काश्मिरला) जोडणारा महामार्ग बांधलेला आहे. चीन या रस्त्याचा वापर प्रामुख्याने लष्करी वाहतुकीसाठी करताना आढळतो. चीनचे हे कृत्य म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वाला दिलेले आव्हानच होय. चीनने सततपणे भारतासोबत 'सीमावाद' उकरून काढल्याचे देखील निदर्शनास येते. मुळात चिनी नेत्यांना भारत व चीन दरम्यानची 'मॅकमोहन रेषा' ही सीमारेषाच मान्य नव्हती.

---

चांगल्या गोष्टी त्यांना मिळतात, जे वाट बघतात. अधिक चांगल्या गोष्टी त्यांना मिळातात जे प्रयत्न करतात; पण सर्वोत्तम गोष्टी त्यांनाच मिळतात जे आपल्या प्रयत्नांवर अतूट विश्वास ठेवतात.

चीनने त्या देशात १९४९ साली साम्यवादी राजवट स्थापन झाल्यापासून काश्मीरचा (पूर्व काश्मीर, म्हणजेच लडाख नजीकचा प्रदेश) बराचसा भाग व अरुणाचल प्रदेश हे भूप्रदेश चीनचे घटक असल्याची सपशेल खोटी व उद्दाम भूमिका घेतल्याचे दिसते. यावरूनच १९६२ साली भारत व चीनच्या दरम्यान युद्ध देखील झाले होते. अर्थात, आक्रमणाची सुरुवात चीननेच केली होती.

चीनने सद्या भारताच्या शेजारील राष्ट्रांना भारताविरुद्ध फितविण्याचा एककलमी कार्यक्रम चालविला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. चीनने अतिशय चाणाक्षपणे दक्षिण आशियात भारताला चोहोबाजूंनी विळखा घालण्याचे परराष्ट्र धोरण गेल्या काही वर्षांपासून अवलंबिले आहे. या धोरणाचा भाग म्हणूनच चीन हा नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार (पूर्वीचा ब्रह्मदेश) मालदीव व अर्थात पाकिस्तान या भारताच्या नजीकच्या शेजाऱ्यांना सर्वतोपरी आर्थिक मदत देत आहे. एवढेच नव्हे तर, चीन या देशांमध्ये लोहमार्ग, महामार्ग, बंदरांचा तसेच इतर पायाभूत सुविधांचा विकास करून देत आहे. अथवा, तसे करण्यासाठी या देशांना कर्ज देत आहे. त्यामुळे या देशांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास होताना तर दिसत आहेच परंतु भविष्यात या देशांना चीनकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे फार कठीण जाणार आहे ही बाब त्यांच्या सध्या तरी लक्षात येत नसल्याचे दिसते. त्याचप्रमाणे याबाबतीत आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारला जाणारा एक प्रश्न म्हणजे, या पायाभूत सुविधा त्या देशांच्या हिताकरिता आहेत की चीनच्या फायद्यासाठी? यातील अनेक प्रकल्प म्हणजे दक्षिण आशियाई देशांतील 'पांढरे हत्ती' झालेले आहेत. उदाहरणच द्यायचे झाल्यास महिंदा राजपक्षे यांच्या राष्ट्राध्यक्षीय काळात श्रीलंका चीनच्या फार जवळ जाण्यास सुरुवात झाली. राजपक्षा यांच्या कारकिर्दीत चीनच्या मदतीने वा चिनी गुंतवणुकीच्या मदतीने 'हम्बंनटोटा' (Hambantota) या बंदराचा विकास करण्याचे ठरले. त्याप्रमाणे या बंदराचा विकास देखील झाला. परंतु या प्रकल्पामुळे श्रीलंकेसारख्या चिमुकल्या देशावर चीनचे आठशे कोटी अमेरिकन डॉलर्स ($ 8 Billion) एवढे भरमसाट कर्ज झाले व या कर्जाची परतफेड करणे जवळ जवळ शक्य नसल्यामुळे श्रीलंकेने हे बंदर चीनला नव्याण्णव वर्षांसाठी वापरण्यासाठी हस्तांतरित केले आहे. या उदाहरणावरून चीनने आपल्या 'वन बेल्ट वन रोड वा बेल्ट अँड रोड' (One Belt One Road / Belt and Road) या उपक्रमांतर्गत कशी बनवेगिरी सुरू केली आहे ही गोष्ट तूर्तास तरी दक्षिण आशियाई देशांच्या लक्षात येत नसल्याचे निदर्शनास येते. मात्र, जेव्हा त्यांना ही बाब लक्षात येईल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल व चिनी 'ड्रॅगनने' त्यांच्या अर्थव्यवस्थेला पूर्णपणे विळखा घालून जखडून टाकलेले असेल. त्यावेळी त्यांना काहीही करता येणार नाही.

पाकिस्तानची भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करण्याची जी हिंमत नजीकच्या काळात वाढलेली दिसते त्यामागे पाकिस्तानला चीनचे पूर्णपणे असलेले पाठबळ होय यात वाद नाही. चीनने पाकव्याप्त काश्मीरमधून (गिलगिट बल्टिस्तान) थेट पाकिस्तानच्या दक्षिणेकडे कराची (सिंध) व ग्वादार (बलुचिस्तान) बंदरापर्यंत जाणारा 'चायना पाकिस्तान इॅकॉनॉमिक कॉरीडॉर' (China-Pakistan Economic Corridor) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत चीन पाकिस्तानमध्ये अनेक लोहमार्ग, महामार्ग, वीजप्रकल्प बांधणार असून तसेच, बलुचिस्तानातील 'ग्वादार' बंदराचादेखील विकास करणार आहे. तज्ज्ञांच्या मते या प्रकल्पाचा खर्च पाच हजार कोटी अमेरिकन डॉलर्स पेक्षाही ($ 50 Billion) जास्त आहे. सध्या पाकिस्तानला या प्रकल्पाच्या नकारात्मक बाबी लक्षात येत नाहीयेत. परंतु भविष्यात या प्रकल्पामुळे पाकिस्तान पूर्णतः कर्जबाजारी होणार व त्या कर्जाची

---

दिवसात तुम्हाला एकही समस्या आली नसेल, तर तुम्ही चुकीच्या रस्त्यावरून जात आहात असे समजावे. – स्वामी विवेकानंद

परतफेड करताना पाकिस्तानच्या नाकीनऊ येणार आहेत यात वाद नाही. त्यामुळे पाकिस्तान चीनचे कर्ज तर परत करणार नाही; परंतु 'चायना पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडोर' अंतर्गत बांधल्या जाणाऱ्या महामार्ग व लोहमार्गांवरून खैबर पाख्तूनवाला व गिलगिट-बाल्टिस्तानमार्गे चीनमध्ये 'दहशतवाद्यांची निर्यात' करणार यात शंका नाही! शेवटी चीननेही विसरू नये की, चीनच्या क्षिनजियांग (Xinjiang) या वायव्येकडील प्रांतात युघुर (Uyghur), उझबेक (Uzbek), किरगिझ (Kyrgyz), तातर (Tatar) इत्यादी मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे व यातील बहुतांशी लोक चीनच्या साम्यवादी राजवटीवर नाराज आहेत. असो.

आपला मुळ मुद्दा असा होता की, पाकिस्तान चीनच्या मदतीच्या व पाठिंब्याच्या बळावर सततपणे भारताला त्रास देण्यात गुंतलेला आहे व याचा चीनला आसुरी आनंद होताना दिसतो आहे. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी तर पाकिस्तानने काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वाहनावर अतिरेकी हल्ला घडवून आणला व त्यात चाळीसहून अधिक जवान शहीद झाले. या भ्याड हल्ल्याची योजना पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मद या अतिरेकी संघटनेने आखली होती. आपणास जैश-ए-मोहम्मद या अतिरेकी संघटनेचा म्होरक्या मसूद अझहर हा पाकिस्तानात खुलेआमपणे फिरताना दिसतो. यावरून पाकिस्तानचा प्रामुख्याने भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करणाऱ्या व पाकिस्तानात सक्रिय असणाऱ्या दहशतवादी संघटनांना खुला पाठिंबा व समर्थन आहे ही बाब अधोरेखीत होते.

नुकतेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परीषदेत अमेरिका, युनायटेड किंगडम (इंग्लंड), फ्रान्स व रशिया या कायमस्वरूपी सदस्य देशांनी मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय अतिरेकी घोषीत करण्याचा प्रस्ताव आणला होता. त्यावेळी चीनने या प्रस्तावाला विरोध करून हा प्रस्ताव हाणून पाडण्यासाठी आपला 'नकारात्मक मत' देण्याचा (Veto Power) अधिकार वापरला होता. त्यामुळे मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषीत करण्यात अडथळे निर्माण होत होते व याला चीन कारणीभूत वा जबाबदार होता. शेवटी भारत, अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांनी मसूद अझहरविषयी सुरक्षा परीषदेत विस्तृत चर्चा घडवून आणण्याचे जाहीर केल्यावर चीनने आपल्या भूमिकेत बदल घडवून मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय अतिरेकी घोषीत करण्याच्या प्रस्तावाला विरोध करण्याची भूमिका सोडून दिली, नव्हे चीनला तसे करणे भाग पडले. त्यामुळे मसूद अझहरला 'आंतरराष्ट्रीय दहशतवादी' घोषीत करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय पातळीवर यश आले. यावेळी चीनने 'नकारात्मक' अधिकार वापरण्याचे टाळले याचे कारण चीनला माहीत होते की, एकदा का या विषयावर विस्तृत चर्चा झाली की, चीनचे आंतरराष्ट्रीय पातळीवर पितळ उघडे पडेल व मसूद अझहरसारख्या धोकादायक दहशतवाद्याला पाठीशी घालणारा चीन म्हणजे किती बेजबाबदार अण्वस्त्रधारी सत्ता आहे ही बाब प्रकर्षाने अधोरेखीत झाली असती. त्यामुळे चीनची केवळ नाचक्कीच झाली असती असे नव्हे तर, चीनला सुरक्षा परिषदेत तो मसूद अझहरला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषीत करण्यासाठी सततपणे का विरोध करत आहे याची सबळ कारणे व स्पष्ट उत्तर द्यावे लागले असते. या सर्व बाबींमुळे चीनला मसूद अझहर हा धोकादायक दहशतवादी आहे ही गोष्ट इच्छा नसताना देखील मान्य करावी लागली. अन्यथा चीनला सिद्ध करावे लागले असते की, मसूद अझहर हा एक खूप चांगला माणूस व सद्गुणांचा पुतळा आहे. असो.

सध्या चीन संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य आहे. त्यामुळे त्याला सुरक्षा परिषदेच्या एकंदरीतच निर्णय प्रक्रियेत अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या परिषदेत पाच कायमस्वरूपी

---

कधीतरी मला कोणत्या तरी प्रकारचे दुःख मिळणार आहे याची जाणीव ठेवून, मी माझ्या आसपासच्या दुःखी माणसांची जमेल तशी मदत केली पाहिजे. - संत ज्ञानेश्वर

सदस्य असतात व हे पाच कायमस्वरूपी सदस्य म्हणजे – अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया व चीन हे होत. या पाचही सदस्यांना महत्त्वाच्या बाबींबाबत 'नकारात्मक' अधिकार (Veto Power) वापरण्याचा वा नकारात्मक मत देऊन ती बाब फेटाळून लावण्याचा अधिकार आहे. याचा अर्थ असा की, जर सुरक्षा परिषदेला एखाद्या बाबीबाबत निर्णय घ्यावयाचा असेल तर या पाचही सदस्यांनी त्या निर्णयाच्या वा प्रस्तावाच्या बाजूने मत दिले पाहिजे. जर एकाही सदस्याने त्यास नकार दर्शविला (Veto Power) तर तो निर्णय सुरक्षा परिषदेत पारीत होत नाही.

चीनने मात्र या अधिकाराचा वापर सततपणे भारताच्या विरोधात केला असल्याची बाब अपल्या निर्दर्शनास येते. भारताने साम्यवादी चीन हा सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य व्हावा यासाठी खूप प्रयत्न केले होते व त्यामुळे चीन सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य होऊ शकला. आज आपल्या या पदाचा वापर वा उपयोग भारताविरुद्धच करून चीन त्याच्यावर भारताने केलेल्या उपकाराची परतफेड अशाप्रकारे करत आहे.

१ ऑक्टोबर १९४९ रोजी चीनमध्ये माओ-त्से-तुंगच्या नेतृत्त्वाखाली साम्यवादी राजवटीची सुरुवात झाली. चिनी साम्यवाद्यांनी माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वाखाली चियांग-काई-शेकच्या सैन्याचा धुव्वा उडवला. चीनमध्ये १९४९ साली साम्यवादी क्रांती होईपर्यंत तेथे चियांग-काई-शेकचे राष्ट्रीय सरकार होते. १९४५ ते १९४९ या कालावधीत चीनमध्ये चियांग-काई-शेकचे सैन्य व चिनी साम्यवादी बंडखोर यांच्यात तुफान यादवी युद्ध चालू होते. या यादवी युद्धाचा शेवट साम्यवाद्यांच्या विजयात झाला व चियांग-काई-शेकला खंडिय चीनमधून (Continental / Mainland China) दक्षिण चिनी समुद्रातील फोर्मोसा (Formosa) (सध्याचे तैवान - Taiwan, तसे पाहता तैवानच्या पश्चिमेला तैवानची सामुद्रधुनी, उत्तरेला पूर्व चिनी समुद्र, पूर्वेला फिलीपाईन समुद्र व दक्षिणेला लूझॉनची सामुद्रधुनी व नैऋत्येला दक्षिण चिनी समुद्र आहे) येथे पळ काढावा लागला. त्यामुळे १९४९ नंतर अशी स्थिती निर्माण झाली की, मुख्य चिनी भूमीवर साम्यवाद्यांची राजवट तर चीनच्याच फोर्मोसा या बेटावर चियांग-काई शेकच्या राष्ट्रीय सरकारचे राज्य होते. त्यावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर फोर्मोसा हाच खरा चीन होय अशी मान्यता पावून त्या देशालाच सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्यत्व देण्यात आले व साम्यवादी चीनला त्या सदस्यत्वापासून वंचित ठेवण्यात आले. येथे एक बाब स्पष्ट करणे जरुरी आहे व ती ही की, दुसऱ्या महायुद्धात (म्हणजेच चिनमध्ये साम्यवादी क्रांती होण्यापूर्वी) चियांग-काई-शेक शासीत चिन म्हणजेच चिनी प्रजासत्ताक (Republic of China) हा देश मित्र राष्ट्रांच्या बाजूने म्हणजेच अमेरिका, इंग्लंड इत्यादी राष्ट्रांच्या बाजूने प्रामुख्याने जपानविरुद्ध अतिपूर्वेकडे लढत होता. त्यामुळेच दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली तेव्हा सुरक्षा परिषदेच्या पाच कायमस्वरूपी सदस्यांपैकी एक सदस्यत्व चीनला देण्यात आले. या पार्श्वभूमीमुळेच १९४९ साली जरी मुख्य चिनी भूप्रदेश साम्यवादी राजवटीखाली गेला व 'पिपल्स् रिपब्लीक ऑफ चायना' (Peoples Republic of China) या नावाने ओळखला जाऊ लागला, तरी पश्मिमेकडच्या, प्रामुख्याने अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी साम्यवादी चीनला सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सदस्यत्व न देता ते तैवानला बहाल केले. असे होण्याचे कारण म्हणजे तो काळ शीतयुद्धाचा होता व अमेरिकेला जगात साम्यवादाचा होत असलेला प्रसार रोखावयाचा होता. या सर्व प्रकारामुळे साम्यवादी चीनचा सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्यत्वाच्या मुद्यावरून नेहमीच जळफळाट होत असे.

---

पोटात गेलेले विष हे फक्त एका माणसाला मारते. पण कानात गेलेले विष हजारोंचे नाते संपवून टाकते. म्हणून दुसऱ्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या पाहण्यावर विश्वास ठेवा.

१९५३ च्या आसपास अमेरिकेने भारतासमोर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सदस्य बनण्याचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु भारताने तेव्हा मोठ्या मनाने या प्रस्तावाला नकार देऊन तैवान (फोर्मोसा) ऐवजी साम्यवादी चीनला सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सदस्यत्व देण्यात यावे ही भूमिका घेतली होती. नंतरच्या काळात बऱ्याचशा देशांची हीच भूमिका बनली व शेवटी १९७१ पासून साम्यवादी चीन संयुक्त राष्ट्र संघटनेचा कायमस्वरूपी सदस्य बनू शकला व तसे होण्यास भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची होती यात वाद नाही. असो.

चीनचा सध्या गाजत असलेला एक आंतरराष्ट्रीय प्रकल्प म्हणजे 'वन बेल्ट वन रोड' (One Belt One Road) वा 'बेल्ट अँड रोड' (Belt and Road) हा प्रकल्प होय. या प्रकल्पाचा उल्लेख आपण अगोदर केलेलाच आहे. या प्रकल्पाअंतर्गत चीनने अनेक लोहमार्ग व महामार्ग बांधण्याचा सपाटा लावला आहे. या लोहमार्गांचे व महामार्गांचे जाळे मध्य आशिया, मध्य-पूर्व (पश्चिम आशिया), युरोप, आफ्रिका, दक्षिण आशिया, आग्नेय आशिया (संपूर्ण इंडो-पॅसिफिक प्रदेश) पसरलेले आहे. 'बेल्ट अँड रोड' प्रकल्पांतर्गत चीन अनेक देशांमध्ये बंदरांचा देखील विकास करत आहे. याचाच एक भाग म्हणून अगोदर नमूद केलेल्या श्रीलंकेतील हम्बंनटोटा या बंदराचा विकास चीनने केला आहे. चीनने हिंद महासागरातील मालदिव्ज् या बेटांचा समूह असलेल्या देशात देखील बंदरांचा विकास केलेला आहे. तसेच पाकिस्तानातील (बलुचिस्तान) ग्वादार बंदराचासुद्धा विकास केला आहे. अर्थात, चीनला या बंदरांचा वापर वा उपयोग स्वतःचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी करावयाचा आहे. ग्वादार बंदरामुळे तर चिनी व्यापारी जहाजांना दक्षिण चिनी समुद्र, मलाक्काची सामुद्रधुनी व हिंद महासागर व अरबी समुद्र एवढा मोठा वळसा घालणे टाळून थेट ग्वादार बंदरातून माल भरून अरबी समुद्र, तांबडा समुद्र, सुएझ कालवा व भूमध्यसागर या जलमार्गांने युरोप, पूर्व आफ्रिका व उत्तर आफ्रिका इत्यादी ठिकाणी आपला माल कमी वेळ व कमी इंधन खर्चून नेणे शक्य होणार आहे. याचे कारण वायव्य चीनमधून 'चायना-पाकिस्तान-इकॉनॉमिक-कॉरिडॉर' या प्रकल्पांतर्गत बांधलेल्या लोहमार्ग व महामार्गांच्या मदतीने चिनी माल वेगाने ग्वादारपर्यंत आणण्यात येईल व तो माल वर सांगितल्याप्रमाणे तेथे जहाजांवर लादून वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये नेण्यात येईल. चायना-पाकिस्तान-इॅकॉनॉमिक-कॉरिडॉर म्हणजे तर भारताच्या पाकव्याप्त काश्मीर विषयक भूमिकेला चीनने थेट दिलेले आव्हान होय. याचे कारण भारताची अजूनही अशी भूमिका राहिलेली आहे की, पाकव्याप्त काश्मीर (गिलगिट-बाल्टिस्तानसह) म्हणजे भारताचाच अविभाज्य भाग होय व तो पाकिस्तानने नियमबाह्य पद्धतीने स्वतःच्या ताब्यात ठेवलेला आहे. त्यामुळे अशा वादग्रस्त भागातून कुठल्याही तिसऱ्या देशाने अशाप्रकारे पायाभूत प्रकल्पांची बांधणी वा उभारणी करणे आंतरराष्ट्रीय नियमांच्या विरोधात तर आहेच, मात्र ते भारताच्या काश्मीरविषयक भूमिकेची कुचेष्टा केल्यासारखे आहे.

(क्रमशः)

**संदर्भ ग्रंथ :**

चायना : फेयरबँक व गोल्डमन

द चायना - पाकिस्तान ॲक्सीस : अँड्र्यू स्मॉल

चायनाज् इंडिया : वॉर : कोलीजन् - बेर्टील लिंन्टर

कोर्स ऑन द रुफ ऑफ द वर्ल्ड

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

चांगल्या लोकांचा आपल्या जीवनातला प्रवेश म्हणजे नशिबाचा एक भाग असतो. पण चांगल्या लोकांना आपल्या जीवनात टिकवून ठेवणे हे आपले कौशल्य असते.

# एक खुले पत्र .....केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना -

*आपला पहिला - वहिला केंद्रीय अर्थसंकल्प आपल्या देशाच्या संसदेला ५ जुलै २०१९ रोजी सादर केलेल्या केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांना श्री. चंद्रशेखर टिळक यांनी लिहिलेले खुले पत्र- संपादक*

मा. निर्मला सीतारामनजी
अर्थमंत्री
भारत सरकार,
नवी दिल्ली.

महोदया,

सर्वप्रथम आपले मनःपूर्वक अभिनंदन!

मोदी सरकारच्या पहिल्या कालखंडात देशाचे संरक्षणमंत्री म्हणून उत्तम कामगिरी केल्यानंतर मोदी सरकारच्या या कालखंडात स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातल्या पहिल्या पूर्णवेळ अर्थमंत्री म्हणून आपण केंद्रीय अर्थखात्याचा कार्यभार स्वीकारलात.

ती भूमिका निभावताना आपण आपला पहिला - वहिला केंद्रीय अर्थसंकल्प आपल्या देशाच्या संसदेला ५ जुलै २०१९ रोजी सादर केलात.

याचा एक भारतीय नागरिक (आणि भाजपाचा पिढीजात मतदार) म्हणून सार्थ अभिमान नक्कीच वाटतो.

पण अगदी मोकळेपणाने सांगायचे तर मोदी सरकारच्या दुसऱ्या कालखंडाचे पहिले दोन महिने आज पूर्ण होत असताना (३० मे २०१९ ते ३० जुलै २०१९) थोडी काळजीही वाटते. म्हणून हे खुले पत्र.

आपणाविषयी व्यक्ती म्हणून किंवा मंत्री म्हणून विरोध नाही. टीकेचा तर प्रश्नच उद्भवत नाही; पण काळजी वाटते. अगदी जरूर वाटते.

या निमित्ताने काही मुद्द्यांबाबत गोंधळ उडतो म्हणून हे खुले पत्र.

त्या निमित्ताने याबाबत मोकळेपणाने जाहीर चर्चा व्हावी इतक्याच माफक हेतूने हे पत्र !

याची सुरवात माझ्या मनात आपले अर्थसंकल्पीय भाषण ऐकताना झाली. त्यातच आपली कालच्या (२९ जुलै २०१९) इकॉनॉमिक टाइम्समधे प्रसिद्ध झालेली मुलाखत वाचली. आणि या विचाराने उचल खाल्ली.

कदाचित असे वाटणे फार घाईचे किंवा अतिशय लवकर असेलही !

पण राहवले नाही ....

म्हणून हे खुले पत्र ....

गेल्या दोन महिन्यांतील आपली अर्थमंत्रीपदाची कारकीर्द, आपले अर्थसंकल्पीय भाषण आणि कालची इकॉनॉमिक टाइम्स मधली आपली मुलाखत तटस्थपणे पाहात असताना (कदाचित निष्कारणही असेल) अस्पष्ट का होईना पण असे वाटत राहाते की, काहीवेळा आपण संदिग्ध आहात, आपण संभ्रमित आहात. अर्थमंत्रीपदाच्या सुरवातीला काही दिवस असं होणं समजण्याजोगे आहे. जबाबदारी आणि पदाने दबायला व्हावे असेच ते खाते आहे ! पण अर्थसंकल्पीय भाषण आणि विशेषतः कालची वर उल्लेख केलेली मुलाखत वाचताना संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन, निश्चलनिकरणाचे राज्यसभेत समर्थन करणाऱ्या संकल्पनात्मक स्पष्टता आणि अचूक शब्द-रचना असणाऱ्या निर्मला सीतारामन कोणी वेगळ्या आहेत की काय असा विचार कुठेतरी चाटून गेला म्हणून हे खुले पत्र !

मी चुकत असेन तर मला मनापासून आनंदच होईल हे नक्की ! ! !

बघा ना, नाहीतर तब्बल २ तास १४ मिनिटे अर्थसंकल्पीय भाषण करून झाल्यानंतर एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर तीनदा संसदेत उभे राहून तुम्हांला काही माहिती सभागृहात सादर करावी लागणे याचं कसं काय समर्थन करायचे?

त्यातली एक गोष्ट 'तूट' यासारखी अत्यंत महत्त्वाची असणे ! ! ! !

पक्का भाजपाई मतदार म्हणूनही आणि तशाही त्या महत्वाच्या आहेत म्हणूनही मी तुमच्या पहिल्या – वहिल्या अर्थसंकल्पाचे गुणगान 'स्त्रीसुलभ संवेदनशीलतेचा संकल्प' म्हणून माझ्या फ़ेसबुक पोस्ट (१५ जुलै २०१९) आणि नंतरही माझ्या १५–२० जाहीर भाषणांत अतिशय हिरिरीने केले.

पण मनात कुठेतरी शंकेची पाल चुकचुकत होती. म्हणून पुन्हा अनेकवेळा अर्थसंकल्पीय भाषण वाचले. मग एक शंका डोकावायला लागली की, तुम्ही मांडलेला हा अर्थसंकल्प जितका आणि जसा स्त्रीसुलभ संवेदनशीलतेचा संकल्प आहे; तसाच आणि तितकाच तो सक्षम सरकारचा संदिग्ध, संभ्रमित संकल्प पण आहे का ?

हे मी १६ जुलै २०१९ च्या माझ्या फ़ेसबुक पोस्ट वर लिहिले आहे; पण माझ्या एकाही भाषणांत बोललो नाही. कारण तेव्हा मला वाटत होते की, अर्थमंत्री म्हणून तुम्ही ३० मे २०१९ रोजी शपथ घेतली आणि अवघ्या ५ दिवसांत तुम्ही केंद्रीय अर्थसंकल्प सादर करायला संसदेत उभ्या राहिल्या होतात !

ही शंका केवळ अर्थसंकल्प सादर झाल्यापासून मुंबई शेअरबाजाराचा निर्देशांक सुमारे २५०० अंशांनी खाली आला आहे म्हणून नाही.

तसेच, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) २०१९ सालासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कमी करत ७ टक्के असल्याचे जाहीर केले म्हणूनही नाही. जगातल्या अनेक देशांबाबत हा दर भारताप्रमाणेच कमी असण्याचे त्यांनी घोषित केले आहे.

पण कालची मुलाखत वाचताना असं पुन्हा वाटायला लागले की काहीतरी कुठेतरी निसटत आहे ... आपल्या नेहमीच्या मराठीत सांगायचे तर 'समथिंग इज मिसिंग!'

आणि मग पुन्हा आणि प्रकर्षाने जाणवायला लागले की, याची सुरवात अर्थसंकल्पीय भाषणातच झाली आहे. ५ देशांत सुरू केलेल्या वकिलातान्चा अनावश्यक उल्लेख, तुटीच्या आकडेवारीचा अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेखच नसणे, रेल्वे खाते अवघ्या दीड ओळीत संपणे, राष्ट्रीय पेन्शन योजनांना दिलेल्या कर – सवलतींचा लंब्या–चौड्या भाषणात उल्लेखच नसणे, व्यापारी वर्गासाठी स्वतंत्र पेन्शन योजनेची घोषणा (आणि नंतर दिलेली वेगवेगळी स्पष्टीकरणं), एकीकडे NHB चे नियंत्रण रास्तपणे रिझर्व्ह बँकेला परत देत असतानाच PFRDA आणि NPS ट्रस्ट यांची विभागणी करणे, नोंदणीकृत कंपन्यांत सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या सहभागाचे प्रमाण २५ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांपर्यन्त वाढवणे, सोशल स्टॉक एक्सचेंजची घोषणा आणि ई–वेईकलची सक्ती या साऱ्याच गोष्टींचा अर्थसंकल्प भाषणाला गोंधळात नेणारा होता आणि आहे.

याची पुढची कडी म्हणजे आपली कालची मुलाखत !

ती वाचत असताना मला राहून राहून माजी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रिगन यांच्या एका विधानाची आठवण येत होती. ते म्हणाले होते ...

Government's view of the economy could be summed up in few short phrases ; If it moves,

---

काय चुकलं हे शोधायला हवं. पण आपण मात्र कुणाचं चुकलं हेच शोधत राहतो!

tax it. If it keeps moving , regulate it. And if it stops moving, subsidise it. कालची आपली मुलाखत एकदम त्याच धाटणीची आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य भारतीय नागरिकाला आणि एकदम पिढीजात भाजपाई मतदार असणाऱ्याला एकच प्रश्न पडला आहे की, एकीकडे भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर करण्याचे रास्त उद्दिष्ट ठेवत असताना हे परवडणारे आहे का ? राज्यशास्त्र आणि सार्वजनिक वित्तशास्त्र (पब्लिक फायनान्स) यांत अनेकदा म्हणले जाते की, Good Governance requires working towards common ground. It is not easy. असं तर हे काही नाही ना ?

अशा प्रश्नांची उत्तरे देणारा एखादा 'मन की बात' सारखा कार्यक्रम माननीय पंतप्रधान किंवा आपण कराल का ? अगदी त्याला Economy please म्हणायचे की It is economy stupid म्हणायचे असा कितीही प्रश्न पडला तरी ! ! ! !

इकॉनॉमिक टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत आपण थेट विदेशी गुंतवणुकीस चालना देणाऱ्या काही मुद्द्यांना स्पर्श केला आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातही त्याबद्दल काही घोषणा करण्यात आल्या आहेत.

पण त्याबद्दल एक गोष्ट अशीही आहे की, सध्या थेट विदेशी गुंतवणूक (FDI) किंवा विदेशी गुंतवणूक (FDI) यांवर फारसे अवलंबून राहाता येणार नाही. याला जितकी आपली देशांतर्गत परिस्थिती कारणीभूत आहे तेवढीच जागतिक.

अशावेळी २००८ चे जागतिक आर्थिक संकट आपण जसे स्थानिक मागणीच्या जोरावर रोखले तसं स्थानिक गुंतवणुकीच्या जोरावरच विकासाचा दर वाढवावा लागेल.

याबाबत, 'तुझा तू वाढवी राजा' हेच खरे !

पण आपण स्थानिक बचत - गुंतवणुकीचे दर गेल्या वीस वर्षात सातत्याने फक्त कमीच करत आहोत. सरकारी धोरणांतून सरकारी गुंतवणूक साधनांच्या (पोस्ट, भविष्य - निर्वाह निधी, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी वगैरे) व्याजदरात कपात झाली. केवळ व्याजदरात कपात झाली इतकेच नव्हे तर, अनेक साधनांच्या मुदतपूर्तीच्या कालखंडात (मच्युरिटी पिरीयड) मधेही वाढ झाली. (उदाहरणार्थ ... नॅशनल सेव्हिंग्स सर्टिफिकेट, इंदिरा विकास पत्रे, किसान विकास पत्र). काही साधनं तर बंदच झाली.

त्याचे अनुकरण साहजिकच खाजगी साधनांतही झाले. एकेकाळी अतिशय जोरात असणाऱ्या कंपन्यांच्या मुदतठेवी सारखा गुंतवणूक - प्रकार आजमितीस जवळजवळ नामशेष झाला आहे.

काळाच्या ओघात गुंतवणुकीची साधने बदलणे हे नैसर्गिकच आहे; पण त्या प्रमाणात नवीन साधने आली नाहीत किंवा लोकांपर्यंत पोहोचली नाहीत. म्युच्युअल फंड योजनांचा काय तो अपवाद !

जेव्हा एक राष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणून वार्षिक विकासाचा दर वाढता ठेवू इच्छितो आणि त्यासाठी अत्यावश्यक असणारा व प्राप्त जागतिक अर्थकारणाच्या स्थितीत देशांतर्गत बचत व गुंतवणुकीचा आकर्षक - आक्रमक दर अत्यावश्यक ठरतो तेव्हा तर यंदाचा अर्थसंकल्प आणि कालची मुलाखत ह्या दोन्ही गोष्टी संदिग्ध भासू लागतात.

अशा परिस्थितीत देशाचे सरकार म्हणून मध्यम ते दीर्घकालीन गुंतवणुकीस चालना देण्याची जबाबदारी ही सरकारला स्वीकारावीच लागते अशीच आजपर्यंतच्या जागतिक आर्थिक इतिहासाची साक्ष आहे. अगदी आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमाला तीस वर्षे पूर्ण होत असली तरीसुद्धा !

अल्पकालीन गुंतवणुकीची साधनं खाजगी क्षेत्राने दिली तरी ते मध्यम ते दीर्घकालीन साधने देत नाहीत

असाच आजपर्यंतचा अनुभव आहे. आणि अशी साधने त्यांनी दिली तरी सर्वसामान्य गुंतवणूकदार त्यावर विश्वास ठेवत नाहीत हे तर आणखीनच गंमतीशीर आहे.

अशा परिस्थितीत पेन्शन क्षेत्रांत थेट विदेशी गुंतवणूक (एफडी आय) स्वीकारण्याचे यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेले सूतोवाच स्वागतार्हच आहे.

पण त्याच अर्थसंकल्पात NPSbm दिलेल्या कर – सवलतींचा अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेखच नसणे, NPS च्या बाहेर सातत्याने वेगवेगळ्या योजना जाहीर करत अशा स्वदेशी योजनांच्या संभाव्य निधीचे विभाजन करत राहणे हे गोंधळात टाकणारे आहे. अर्थातच याबाबत केवळ तुम्हांला दोष देणे अनुचित होईल. २०१४ पासूनच्या मोदी सरकारातील मा. श्री. अरुण जेटली आणि मा. श्री. पियुष गोयल या तुमच्या आधीच्या अर्थमंत्र्यांनीही हेच केले आहे!

अशा विभाजनातून पेन्शन योजनांतून होणाऱ्या मिळकतीवर विपरीत परिणाम होतो. होऊ शकतो. त्यातून आधीच दीर्घकालीन गुंतवणूक करण्यास फारशी राजी नसणारी तरुणाई अशा गुंतवणुकीपासून आणखीनच लांब जाईल त्याचे काय ? आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ५८ टक्के वाटा असणाऱ्या सेवा क्षेत्रांत हीच तरुणाई प्रामुख्याने कार्यरत आहे. तसेच २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकीत मोदी सरकार सत्तारूढ होण्यास हाच वयोगट सगळ्यात जास्त कारणीभूत आहे. त्यामुळे याबाबत असं गोंधळलेले राहणे ना आर्थिक दृष्ट्या परवडणारे आहे; ना राजकीयदृष्ट्या ! ! !

याबाबत अजून एक मुद्दा म्हणजे उपरोक्त मुलाखतीत रिझर्व्ह बँकेने व्याजदरात अजून कपात करावी अशी आपण व्यक्त केलेली अपेक्षा. प्रश्न रिझर्व्ह बँक व्याजदरात कपात करेल की नाही हा जसा आहे; तितकाच अशी कपात व्यावसायिक बँका कर्जदारांना देणार का हाही आहे. मुळातच बँका आजकाल खरोखरच कर्ज – पुरवठा करण्याच्या मनःस्थितीत आहेत का हा खरा प्रश्न आहे. त्याबद्दल आपली मुलाखत मौन राखून आहे.

अशावेळी राहून राहून वाटते की, राष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणून पूर्णत्वाने गेल्या १५ वर्षांत विचार झालेला नाही आणि आपल्या अर्थव्यवस्थेची संरचनाच (Economic Composition) पूर्णपणे बदलली आहे हेच लक्षात घेतले जात नाहीये.

असो.

कारण हा एका स्वतंत्र पत्राचा विषय होईल.

महोदया, मला राहून राहून वाटणारी भीती ही आहे की, आपली अर्थमंत्री म्हणून असणारी कामगिरी तुमचे पहिले – वहिले अर्थसंकल्पीय भाषण आणि तुमची कालची मुलाखत झाकोळून तर टाकणार नाही ना ! कारण या दोन गोष्टी निदान काही प्रमाणात तरी तुम्ही आर्थिक धोरणाबाबत पुरेशा स्पष्ट नाहीत असा संकेत देणार किंवा देत नाहीत ना ? आणि तसे असल्यास किंवा झाल्यास अशी चर्चा केवळ यापुरेशी मर्यादित न राहता केवळ आर्थिक धोरणाच्या दिशेबाबत आपण पुरेशा स्पष्ट नाही इथपासून; आपण अर्थमंत्री किती काळ राहणार याबाबतही स्पष्ट नाही (आपण अर्थखात्याची जबाबदारी तात्पुरत्या स्वरूपात सांभाळत आहात अशा अर्थाने) अशी तर नको त्या दिशेने अनावश्यक अंगाने पसरणार नाही ना अशी भीती आणि काळजी वाटते.

सध्याच्या सामाजिक माध्यमे आणि प्रसार – माध्यमे यांत असणारे वातावरण बघता अशी भीती अनाठायी नसावी.

म्हणतात ना... म्हातारी मेल्याचे दुखः नाही; काळ सोकावतो आहे. सरतेशेवटी, हा पंतप्रधानांचा

(पृष्ठ क्र.२५वर)

आपली प्रसिद्धी होण्यास सुरुवात झाली की आपली किंमत कमी करण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो, मात्र संयम राखला तर आपले अस्तित्व कुणीही संपवू शकत नाही.

# श्रावण मास

*श्रावण महिन्यातील सण व उत्सवांवर डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांनी लिहिलेला लेख - संपादक*

आषाढ संपता संपताच सर्वांना श्रावणाचे वेध लागले.

**श्रावण मानसी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे।**
**क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे।।**

चातुर्मासातील पहिला महिना श्रावण. श्रावणातील पहिला सण नागपंचमी.

भारतीय संस्कृती आपल्याला मानव तसेच मानवेतर सृष्टी प्रेमाने पाहायला शिकवते.

नागाला देव मानून या दिवशी नागाची पूजा केली जाते. आपला देश शेतीप्रधान आहे. हा साप त्या शेताचे रक्षण करतो. उंदीर, घुशी तसेच प्राणी पीकांचे नुकसान करतात त्यांचा नाश करून पिकाला हिरवेगार ठेवतो. साप उगाचच कोणाला चावत नाही. त्याला हैराण करणाऱ्याला किंवा त्याची छेड काढणाऱ्याला तो दंश करतो. सापाला सुगंध आवडतो. त्यामुळे तो चाफा, चंदन, केवडा, मोगरा या झाडांच्या सान्निध्यात असतो. दुर्जनदेखील भगवद् कार्यात जोडला गेला तर प्रभूदेखील त्याचा स्वीकार करतात. या गोष्टीचे समर्थन शंकराने सापाला गळ्यात घालून व विष्णूने शेषावर शयन करून केले आहे.

सर्व सृष्टीच्या हितासाठी बरसणाऱ्या पावसामुळे निर्वासित झालेला साप जेव्हा आपल्या घरात अतिथी बनून येतो तेव्हा त्याला आसरा देऊन त्याचे पूजन करणे हेच आपले कर्तव्य आहे. ह्या दृष्टीने नागपंचमीचा उत्सव श्रावण महिन्यातच आयोजित करण्यात आपल्या ऋषींनी फारच औचित्य दाखवले आहे.

सापाची पूजा करून त्याला दूध लाह्यांचा नैवेद्य दाखवला जातो.

या नैवेद्यामागेसुद्धा एक उद्देश आहे. आषाढ, श्रावणात पडणाऱ्या पावसामुळे शरीरात अग्निमांद्य होते म्हणजेच भूक लागत नाही किंवा कमी लागते. अशा वेळी हलके पदार्थ घ्यावेत. लाह्या या पचायला अतिशय हलक्या असल्यामुळे त्यांचे सेवन आपल्या आरोग्याला हितकारक आहे.

वर्षा ऋतूमुळे शरीरात वाढलेली रुक्षता कमी व्हावी आणि शरीराचे पोषण व्हावे म्हणून दुधाचे प्रयोजन असावे.

या दिवशी स्त्रिया हळदी कुंकू देतात. मैत्रिणींना घेऊन गाणी म्हणतात. झिम्मा, फुगडी यासारखे खेळ खेळले जातात. फांदीला दोरी बांधून त्यावर झोके घेतात. त्यामुळे मनावरचा ताण कमी होतो आणि उत्साहाने आपली दैनंदिन कामे केली जातात.

**शीतला सप्तमी**

श्रावण महिन्याच्या शुद्ध आणि वद्य दोन्ही सप्तमीला 'शीतला सप्तमी' म्हणतात.

शीतला सप्तमीच्या दिवशी स्त्रिया शेगडीची पूजा करतात. कारण ती स्वयंपाक घरातील देवता आहे. स्वतः तापून जी रोज आहार शिजवून देते त्या चुलीचे (शेगडीचे) पूजन करून स्त्रिया तिच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतात. एवढेच नाही तर, तापलेल्या चुलीत

पैज लावायची तर स्वतः सोबतच लावा; कारण जिंकलात तर स्वतःचा आत्मविश्वास जिंकाल आणि हरलात तर स्वतःचाच अहंकार हराल!

त्या दिवशी आंब्याचे लहान रोपही ठेवण्यात येते. ह्याच्या पाठीमागे आम्रवृक्षाची शीतलता सतत मिळत राहावी व आंब्याच्या फळासारखा गोडवा तिने भोजनात भरावा ही भावना असते.

हा उत्सव साधन पूजेचा महिमा समजावतो. ज्या साधनांद्वारे आपण काम करतो त्याच्याबद्दल कृतज्ञ बुद्धी ठेवली पाहिजे. त्या साधनात असलेल्या सुप्त चैतन्याची आपण पूजा केली पाहिजे. म्हणून आपल्या संस्कृतीत लेखणी, तलवार, नांगर, तराजू, वही, झाडू, केरसुणी, शेगडी या सर्वांची पूजा वेगवेगळ्या उत्सवात केली जाते.

**श्रावणी पौर्णिमा – रक्षाबंधन**

ज्ञाननिष्ठ ब्राह्मणांचा यज्ञोपवित (जानवे) बदलण्याचा उत्सव, बंधुभगिनींचा रक्षाबंधनाचा उत्सव व कोळी बांधवांचा समुद्र पूजनाचा उत्सव अशा तीन उत्सवांचा त्रिवेणी संगम म्हणजे श्रावणी पौर्णिमा.

जानवे म्हणजे तेजस्वी दीक्षा, जानवे म्हणजे बुद्धिचे प्रज्ञेत परिवर्तन करणारे रसायन. ॐ भुर्भूवः स्वः ॐ तत्सवितुवरेण्यं भर्गो देवस्य धीमही। धियो यो न प्रचोदयात।

''प्रेरणा देणाऱ्या, उत्पन्न करणाऱ्या परमात्म देवतेचे स्वीकारण्यास योग्य, शुद्ध तेज आम्ही धारण करतो. ते आमची बुद्धी, कर्म वगैरेंना नेहमी सन्मार्गाकडे प्रवृत्त करीत राहो.''

बुद्धीला तेजस्वी करणारी गायत्री मंत्राची दीक्षा जानव्यासोबतच देण्यात येते.

जानवे घेणे म्हणजे जीवनाचे ध्येय निश्चित करणे. प्रभू श्रद्धा दृढ करणे, सांस्कृतिक श्रद्धा तेजस्वी ठेवणे हे सर्व समजावण्याची गरज आहे. ज्या द्विजांनी हे ज्ञान प्राप्त केले आहे ते अशा तरुणांना हे महत्त्व समजावतील तरच या उत्सवाची सार्थकता झाली असे म्हणता येईल.

**रक्षाबंधन**

रक्षाबंधन म्हणजे प्रेमबंधन. आजच्या दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधते.

भावाच्या हाताला राखी बांधून बहीण त्याच्यापासून केवळ स्वतःचेच रक्षण इच्छिते असे नाही, तर सर्व स्त्री जातीला स्वतःच्या भावाचे रक्षण मिळावे असा त्याग, सेवा आणि प्रेमाचा संदेश देणारा उत्सव आहे. रक्षाबंधन म्हणजे दृष्टी परिवर्तनाचा उत्सव. सख्ख्या बहिणीबद्दल कोणाही भावाची दृष्टी निर्मळ, प्रेमाची असतेच. गरज आहे समाजात स्त्रीकडे पाहणारी विकारी दृष्टी बदलण्याची. भाऊ व बहीण परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव आहे.

समाजात सर्व स्त्रिया आपल्या बहिणी आहेत आणि सर्व पुरुष आपले भाऊ आहेत याची जाणीव समाजाला आली पाहिजे.

**नारळी पौर्णिमा**

श्रावण शुद्ध पौर्णिमेलाच नारळी पौर्णिमा असे म्हणतात. सागराच्या काठी राहणारे लोक समुद्राची पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करतात. आषाढ महिन्यात समुद्र खवळलेला असतो तो शांत व्हावा, समुद्रावरील व्यवहार, वाहतुक व्यवसाय सुरळीत चालावा यासाठी समुद्राची पूजा केली जाते. तसेच समुद्रामुळेच पाऊस पडतो. धन-धान्याने माणूस समृद्ध होतो. मानवी जीवन सुखकर होते म्हणून कृतज्ञतेच्या भावनेने ही पूजा केली जाते.

या दिवशी आपल्या घरांमध्येही नारळी भात, नारळाच्या वड्या यासारखे नारळापासून होणारे पदार्थ केले जातात.

पाऊसामुळे वातावरण थंड झालेले असते. सगळीकडे ओलसरपणा असतो. याचा परिणाम आपल्या

आयुष्य हे बॉक्सिंगच्या खेळासारखं आहे. तुम्ही खाली पडलात म्हणून तुम्ही हरत नाही, तर तुम्ही उठण्याचा प्रयत्न केला नाही तरच तुम्ही हरलात असं ठरतं!

शरीरावर होऊन शरीरातील वात दोष वाढतो. रुक्ष अशा वातदोषावर हे स्निग्ध असणारे नारळी पदार्थ उपयोगी पडतात म्हणून या अन्नपदार्थांची योजना केली जाते.

याशिवाय या काळात इतर वातघ्न औषधींचाही उपयोग करावा. तसेच, बस्ती हा वात दोषावर उपयोगी असा उपक्रम करावा म्हणजे बस्ती घ्यावा.

**गोकुळ अष्टमी**

श्रावण वद्य अष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी. या दिवशी मथुरेच्या बंदिशाळेत देवकीच्या पोटी मध्यरात्री श्रीकृष्णाचा जन्म झाला. वडील वसुदेवांनी श्रीकृष्णाला यमुना नदी ओलांडून नंदाकडे पोहोचते केले.

श्रीकृष्णाचे चरित्र अद्भुत प्रसंगांनी भरलेले आहे. भगवान विष्णूचा हा अवतार पूर्णावतार मानला जातो. गवळ्यात मिसळून त्यांना धर्मयुद्धाकरिता जागवले. त्याने अघासुर, बकासुर यांना ठार केले. अघ म्हणजे पाप, बक म्हणजे दंभ. पापी आणि दंभी वृत्तीच्या लोकांचा नाश केला. विषारी कालिया नागाचा नाश केला.

इंद्राचे म्हणजे वैभवाचे पूजन बंद करून गोधनाचे पोषण करणाऱ्या गोवर्धनाची पूजा सुरू केली. त्यातून गोवर्धनाविषयीची कृतज्ञता व्यक्त करायला सांगितले.

श्रीकृष्ण लहान असताना लोण्याची चोरी करून सर्व बालगोपाळांना खाऊ घालत होता. त्यांचे जीवन पुष्ट करत होता. त्यामुळे आतल्या आत होणारे क्लेश, कलह खरेखोटेपणा राहतच नसे. सर्वजण प्रेमाने व शांतीने राहत असत.

कृष्णाने सामाजिक ऐक्य नजरेसमोर ठेवून समाजाचे नियमन केले. दांभिक, खोटे, लुच्चे, स्वार्थी, भोग लंपट लोक आपले स्वजन होऊच शकत नाहीत. भले मग ते मामा, मावशी किंवा आत्या कोणीही असोत, आपल्या कार्यात जे आडवे आले त्यांना त्याने आडवे केले.

तत्त्वज्ञानाचा द्रष्टा, अध्यात्म उद्गात, उपनिषदाचा चिंतक आणि दैवी संस्कृतीचा नम्र उपासक.

कृष्णाने जगाला गीतेसारखे अद्भूत तत्त्वज्ञान दिले आहे. गीतेत कोणत्याही ठिकाणी आग्रह नाही. सांप्रदायिक संकुचितपणापासून गीता मुक्त आहे.

अतिशय उत्कृष्ट जीवन जगून दाखवणारा आणि अतिशय सहजतेने मृत्यूला स्वीकारणारा कृष्ण हा प्रत्येक भारतीयाचा आदर्श असला पाहिजे. म्हणून त्याची मनोभावे पूजा केली जाते.

गोकुळाष्टमीच्या दिवशी दिवसभर उपवास करून रात्री कृष्णपूजा करून सुंठवड्याचा नैवेद्य केला जातो. हा सुंठवडाही वातशामक आहे. शरीरातील वात कमी करतो.

दुसऱ्या दिवशी अतिशय उत्साहात दहीहंडीचा सोहळा होतो. गोविंदापथक दहीहंडी फोडण्यास येतात. या दहीहंडीचा खेळही आपल्याला साहस, एकत्रीकरण आणि संघटनत्वाचा संदेश देतो.

**पिठोरी आमावस्या**

श्रावण वद्य अमावस्या म्हणजेच पिठोरी अमावस्या. पुत्रवती स्त्रिया ही पिठोरी अमावस्या करतात. या दिवशी चौसष्ट योगिनींची चित्रे काढली जातात. त्या चित्रांचा कागद भिंतीवर लावला जातो. पिठाच्या मूर्ती तयार केल्या जातात आणि त्यांची मनोभावे पूजा केली जाते, खिरीचा नैवेद्य दाखविला जातो. अतिथी कोण? असे म्हणून मागे-पुढे असलेल्या पुत्राकडे न पाहता वाण दिले जाते. हे व्रत केलं म्हणजे मुलबाळ दगावत नाही असे पूर्वीचे लोक सांगत असत.

स्त्रीला सौभाग्य देणारी तशीच पुत्र पौत्रवती बनवणारी ही अमावस्या मातृदिन म्हणून ओळखली

---

प्रत्येक फुल देवघरात वाहिलं जात नाही, तसं प्रत्येक नातही मनात जपलं जात नाही. मोजकीच फुलं असतात देवाचरणी शोभणारी, जी तशी मोजकीच माणसं असतात क्षणोक्षणी आठवणारी.

जाते. एका स्त्रीचा पुत्र मृत जन्मला होता म्हणून वनात जाऊन तिने योगिनींना प्रसन्न करून घेऊन स्वतःचा पुत्र जिवंत व्हावा अशी प्रार्थना केली होती. ती फळाला आली आणि योगिनीच्या आशीर्वादाने तिचा पुत्र जिवंत झाला अशी भविष्यपुराणात एक कथा आहे. या कथेचे सार असे आहे की, जन्माला यावा एवढेच नाही, तर तो जिवंतही राहिला पाहिजे.

आई ही बालकाचीच नाही तर त्याच्या संस्काराचीही जननी आहे.

भारतीय संस्कृती अनेक वीर मातांनी सुशोभित केली आहे. अशा सर्व वीरांच्या मातांचे आज स्मरण केले पाहिजे.

**पोळा**

श्रावण वद्य अमावस्येलाच पोळा हा सण साजरा केला जातो. त्या दिवशी बैलांना स्वच्छ धुऊन त्यांच्या अंगाला हिंगुळ लावला जातो. त्यांची शिंगे रंगवली जातात, गळ्यात सुंदर माळा, पायात घुंगरे, पाठीवर रंगीबेरंगी झुली घालून बाशिंगे बांधून त्यांना सजवले जाते. सुवासिनी बैलांना ओवाळतात, त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालतात. बैलांची वाजत-गाजत मिरवणूक निघते.

वर्षभर बैलाकडून काम करून घेण्यात येते. त्याच्या श्रमातून शेती फुलत जाते. शेतकरी हा सण बैलाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा करतात. खीर, पुरणपोळीही अतिशय पौष्टिक असते. शरीरातील वातवृद्धीमुळे एक प्रकारचा अशक्तपणा आलेला असतो. या पोळीतील चणा आणि गुळामुळे, त्यावर घेतल्या जाणाऱ्या साजुक तूपामुळे शरीराला बल मिळते म्हणून या आहाराची योजना अशा सणांमधून आपल्या पूर्वजांनी युक्तीपूर्वक केली आहे.

अशा पद्धतीने आपले सगळे सण साजरे करण्याची पद्धत, सणाच्या दिवशी केलेली प्रसादाची किंवा नैवेद्याची योजना, त्यातील आहार घटक हे त्या त्या ऋतूला अनुसरून व आपल्या आरोग्याचा विचार करून केली आहे हे नक्की.

आपण मात्र त्यामागचे शास्त्र समजून घेणे गरजेचे आहे.

**- डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

•••

---

(पृष्ठ क्र.२१ वरून- **एक खुले पत्र .....केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना** )

सर्वाधिकार आहे हे माहिती असूनही असे सुचवावेसे वाटते की, जयवंत सिन्हाना अर्थखात्याचे राज्यमंत्री करणे उपयुक्त ठरेल !

आपण यावर यथायोग्य निर्णय घ्याल याची पूर्ण खात्री आहे.

आपला,
एक पिढीजात भाजपाई मतदार.
चन्द्रशेखर टिळक
३० जुलै २०१९.
(ही सर्वच माझी वैयक्तिक मते आहेत.)

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

---


हसत राहिलात तर संपूर्ण जग आपल्याबरोबर आहे. नाहीतर डोळ्यांतल्या अश्रुंना पण डोळ्यांमध्ये जागा नाही मिळत!

# मानसिक आजाराविषयीचा कलंक-एक सामाजिक समस्या

*मानसिक आजारावर भाष्य करणारा लेख- संपादक*

मानसिक आजारांचे मोठे प्रमाण आणि इतर शारीरिक आजारांशी असलेला त्यांचा सहसंबंध लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने २००१ साली जाहीर केले की, समाजाचे आरोग्य मानसिक आरोग्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही- There is no health without mental health. परंतु मानसिक आरोग्याचे उद्दिष्ट साध्य करण्यातील एक महत्त्वाचा अडथळा म्हणजे मानसिक आजारांविषयी असलेली कलंकपणाची भावना अर्थात स्टिग्मा. बहुतेक समाजात कलंकपणाची भावना आजही इतकी मोठी आहे की, तज्ज्ञ आणि धोरणकर्ते एकमुखाने कबूल करतात की, मानसिक आजारांविषयी असलेली कलंकपणाची भावना जोपर्यंत जात नाही तो पर्यंत संपूर्ण मानसिक आरोग्याचे उद्दिष्ट गाठणे अशक्य आहे. There is no mental health without eliminating stigma.

एखाद्या आजाराविषयी जर शरमेचा,लज्जेचा, तिरस्काराचा आणि भेदभाव करण्याचा दृष्टीकोन असेल तर त्या आजाराविषयी कलंक आहे असे आपण म्हणतो. महारोग अथवा लेप्रसी या आजाराविषयी अशी भावना अगदी आत्तापर्यंत होती. अशा रुग्णांसाठी लोक वाईट शब्द वापरायचे, रोटीबेटीचा व्यवहार करायचे नाहीत आणि रुग्ण व कुटुंबीयांना वाळीतदेखील टाकायचे. परंतु काळाच्या ओघात लेप्रसीवर चांगले उपचार उपलब्ध झाले, बरे होण्याचे प्रमाण वाढले आणि मग लेप्रसीविषयीचा कलंक दूर झाला. क्षयरोग (Tuberculosis), तसेच एचआयव्ही/एड्स या आजारांविषयी देखील अशीच भावना आपल्या समाजात आत्तापर्यंत होती. परंतु प्रभावी उपचार, बरे झालेल्या रुग्णांची उदाहरणे आणि परिणामकारक आणि सुनियोजित कलंकनिर्मूलन मोहीम (campaign) या गोष्टींमुळे या दोन्ही आजारांविषयीचा कलंक दूर झाला. परंतु, दुर्दैवाने मानसिक आजारांविषयी कलंकाचा हा दृष्टीकोन आजही आहे.







विख्यात समाजशास्त्रज्ञ इर्विन गोफमन म्हणतो- स्टिग्मा ही अशी गोष्ट आहे की ज्यामुळे व्यक्तीची आयडेंडिटी अथवा व्यक्तित्व खराब होते आणि लोकांच्या मनात ती व्यक्ती एक सामान्य अथवा संपूर्ण व्यक्ती म्हणून मानली जात नाही आणि नेमकी हीच गोष्ट कोणत्याही माणसाला भयावह वाटते. स्किझोफ्रेनिक नॉनिमसच्या संस्थापकानी केलेले विधान मानसिक आजाराला तोंड देण्यापेक्षा त्याच्या विषयीच्या कलंकितपणाच्या भावनेला तोंड देणे जास्त अवघड आहे याचे एक प्रातिनिधीक उदाहरण म्हणून बघता येईल.

---

धुक्याने एक छान गोष्ट शिकवली की, जीवनात रस्ता दिसत नसेल तर दूरचं पाहण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ असतं, एक एक पाऊल टाकत चला, रस्ता आपोआप मोकळा होत जाईल!

**कलंकाचे स्वरूप आणि प्रकार :**

कलंक अथवा स्टिग्मा तीन प्रकारात आपल्याला विभागता येतो.

समाजात असलेली कलंकाची भावना अथवा पब्लिक स्टिग्मा .. मानसिक आजार आणि आजारी व्यक्तीविषयी समाजाच्या मनात कमीपणाची, तुच्छतेची भावना असेल तर त्याला पब्लिक स्टिग्मा म्हणतात. कमीपणा आणणारे शब्द, म्हणी, हावभाव यांच्याद्वारे हा स्टिग्मा व्यक्त होत असतो.




**सेल्फ स्टिग्मा अथवा आजारी व्यक्तीला असणारा स्टिग्मा :**

मानसिक आजारी व्यक्ती शेवटी समाजाचाच भाग असते. समाजाच्या बऱ्या-वाईट समजुती, दृष्टिकोन तिनेही धारण केलेले असतात. समाजाचा दृष्टिकोन जर कलंकाचा असेल तर आजारी व्यक्तीच्या मनात देखील स्वतःच्या आजारपणाविषयी कमीपणाची, तुच्छतेची भावना असण्याची शक्यता असू शकेल आणि निरनिराळ्या सामाजिक वर्तुळांमध्ये मिसळण्याचे ती टाळेल.

**असोशीएटेड स्टिग्मा अथवा संबंधित स्टिग्मा :**

मानसिक आजाराच्या बाबतीत केवळ आजारी व्यक्ती नाही तर आजाराशी संबंधित म्हणजे मानसिक आजारावरील उपचार, तज्ज्ञ, मनोरुग्णालये आणि कुटुंबीय अशा सर्वच गोष्टींविषयी स्टिग्मा समाजाकडून व्यक्त केला जातो.




**कलंकाचे परिणाम :**

वरवर पाहता स्टिग्मा हा कमी धोकादायक अथवा दुर्लक्ष करण्यासारखा असा वाटू शकतो. कारण डोळ्यांनी दिसतील अथवा क्रूर, अन्यायकारक आणि तत्काळ उपाययोजना करायला पाहिजे असे त्याचे परिणाम वाटणार नाहीत. परंतु डायबेटीस,कॅन्सर अशा 'सायलेंट आजार' समजल्या जाणाऱ्या आजारांप्रमाणे तो एक सामाजिक आजार आहे. एरवी छोट्या वाटणाऱ्या स्टिग्माचे आपण परिणाम बघितले तर ते सर्वदूर, सर्वव्यापी आणि काढून टाकायला चिवट म्हणजे समाजातील सुधारणेंच्या विचारांना फारसे दाद न देणारे असे असतात. स्टिग्माचे विविध परिणाम बघितले तर त्याचे गांभीर्य आपल्याला समजून येईल.

**१. उपचारातील तफावत (ट्रीटमेंट गॅप)** : उपचारांची जरूरी असणाऱ्यांपैकी किती टक्के लोकांना उपचार घेता येत नाहीत यावरून उपचारातील तफावतीचे प्रमाण ठरते.

नातं आणि विश्वास हे एकमेकांचे खूप चांगले मित्र आहेत. नातं ठेवा अगर ठेवू नका, विश्वास मात्र जरूर ठेवा. कारण जिथं विश्वास असतो तिथं नातं आपोआप बनत जातं.




भारतामध्ये उपचारांची जरूरी असणाऱ्यांपैकी केवळ २० ते ३० टक्के लोक उपचार घेत असतात याचा अर्थ असा की, उरलेले ७० ते ८० टक्के लोक उपचारांपासून पारखे झालेले असतात. यालाच उपचारांमधील तफावत किंवा ट्रीटमेंट गॅप असे म्हटले जाते.

**२. उपचारातील उशीर : (ट्रीटमेंट डिले) :** लक्षणे दिसायला लागल्यापासून किती काळाने उपचाराला सुरुवात झाली यावरून उपचारातील उशीर मोजला जातो. मानसिक आजाराच्या बाबतीत उपचार घेणाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे आणि जे लोक उपचार घेतात ते देखील खूप काळाच्या अंतराने उपचार घेतात. जी मर्यादित आकडेवारी उपलब्ध आहे ती असे सांगते की, गंभीर मानसिक आजारांच्या बाबतीत ३ ते ५ वर्षे तर अन्य मानसिक आजाराच्या बाबतीत दहा ते पंधरा वर्षे इतका उशीर झालेला दिसून येतो.

**३. उपचारातील धरसोड (डिसकंटिन्युएशन):** मानसिक आजारांविषयी स्टिग्मा असल्यामुळे औषध योजना थांबवण्याची घाई रुग्ण आणि कुटुंबीयांना नेहमीच असते. त्याचप्रमाणे काही वेळेला इतरांना कळू नये म्हणून देखील औषध योजना थांबवावी लागते. अशा धरसोडीचा दीर्घकालीन परिणाम आजारातून सुधारणा होण्याच्या भवितव्यावर होत असतो.

**४. आयुष्यभर ताणाखाली जगणे :** स्टिग्माच्या प्रभावामुळे आजारी व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीयांना सतत एक प्रकारच्या ताणाखाली रहावे लागते. त्या ताणाचा त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर तर परिणाम होतोच, परंतु त्याच बरोबर त्यांच्या दीर्घकालीन कार्यक्षमतेवर देखील परिणाम होतो.

**५. भेदभाव :** स्टिग्मामुळे आजारी व्यक्ती व कुटुंबीय यांना नोकरी, व्यवसाय आणि वेगवेगळ्या सामाजिक वर्तुळांमध्ये भेदभाव अथवा डिस्क्रिमिनेशन हे देखील सहन करावे लागते.

**कलंक निर्मुलनासाठी उपाययोजना :**

भारतात आणि जगभर स्टिग्मा निर्मूलन करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. हे विविध मार्ग खालील प्रकारे विभागता येतील.

**व्यक्ती :** परिणामकारक उपचार, समुपदेशन, स्वमदत गट, रुग्णाला कुटुंबीयांकडून आधार आणि पुनर्वसनाच्या सोयी अशा विविध मार्गांनी जलद सुधारणा होऊ शकते. रुग्णामध्ये होणारी सुधारणा लोकांना चटकन लक्षात येते आणि स्टिग्मा कमी करण्याचा तो एक प्रभावी मार्ग आहे. आजारी व्यक्तीला देखील स्टिग्माजन्य भाषा, दृष्टीकोन आणि वर्तनाला तोंड द्यायला शिकवता येते.




**सामाजिक :** स्वत:च्या मनातील तसेच इतरांच्या मनातील स्टिग्मा काढून टाकण्यासाठी लोकांना प्रशिक्षण देता येईल. त्यासाठी माहितीपत्रके, छोटे व्हिडिओ आणि प्रशिक्षणासाठी साहित्य बनवता येईल. या शिवाय बऱ्या

अडचणी आयुष्यात नव्हे तर मनात असतात. ज्या दिवशी मनावर विजय मिळवाल त्या दिवशी आपोआप मार्ग निघेल.




झालेल्या रुग्णांचे अनुभवकथन या मार्गाचा देखील अवलंब करता येईल. रुग्णांबरोबर प्रत्यक्ष संवाद हा मार्ग सर्वात जास्त प्रभावी आहे असे संशोधनातून दिसून येते. स्टिग्मा वाढवणाऱ्या समाजातील गोष्टींचा निषेध करणे (Protest) आणि स्टिग्मा कमी होण्याच्या दृष्टीकोनातून योग्य ते कायदे आणि धोरण आणण्यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा करणे (Advocacy) हे सामाजिक पातळीवर असलेले आणखीन काही मार्ग आहेत.

**धोरण आणि कायदा :** संस्था आणि सरकार पातळीवर मानसिक आजारी व्यक्तींसाठी अनुकूल वातावरण आणि कार्यप्रणाली तयार करणे. तसेच भेदभाव कमी करण्यासाठी योग्य असे वातावरण तयार करणे या गोष्टी केल्या जातात.

**स्टिग्माची काही उदाहरणे :**

• पुण्यातील एक ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. प्रफुल्लता नेर्लीकर म्हणतात, 'गेली चाळीस वर्षे मी मनोविकार तज्ज्ञ म्हणून काम करीत आहे. आजही रुग्ण आम्हाला हॉस्पिटलच्या व्यतिरिक्त भेटण्याची वेळ आली तर टाळतात. काही रुग्णांची लग्ने होतात पण आम्हाला कधी कोणी बोलावल्याचे आठवत नाही'.

• सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मंदार म्हणतो, 'आमच्याकडे मानसिक आजारी व्यक्तीला gone case, out of control, सायको, ब्रेक फेल, आटा ढिला असे कमीपणा आणणारे शब्द वापरले जातात.

• टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून (TISS) एम.एस.डब्ल्यू केलेली बावीस वर्षांची प्रियांका म्हणते 'त्या वेळेला माझी आई मनोरुग्णालयात होती. कोणीतरी तिला उद्देशून 'पागल' शब्द वापरला. मी माझ्या आईकडे या दृष्टीने कधी बघितलेच नव्हते. या शब्दाचा वापर माझ्यासाठी अत्यंत वेदनादायी असाच होता.

• मानसिक आरोग्य क्षेत्रातील 'सा' च्या एक तडफदार कार्यकर्त्या सौ. स्मिता गोडसे म्हणतात – मानसिक आजर/रुग्ण/मनोरुग्णालये या संदर्भात कलंकपणाची भावना ही किती भयावह आहे हे जोपर्यंत आपला स्वत:चा प्रत्यक्ष संबंध येत नाही तोपर्यंत कळत नाही.

• पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेतील प्राध्यापिका गौरी




कुलकर्णी म्हणतात– 'मी मानसशास्त्राची एक विद्यार्थिनी आहे, प्राध्यापक आहे, पण त्या आधी एक माणूस आहे. मी जेंव्हा मानसशास्त्र हा विषय स्पेशलसाठी निवडला तेंव्हा घरात यावर बरेच वाद–प्रतिवाद झाले. वेड्यांचा विषय शिकून तू काय दिवे लावणारेस? या वरून सतत जाणवत गेले की, मी तर फक्त अभ्यास करत होते तरी माझ्या भोवतीची माणसे असे बोलत आहेत, वर्तन करत आहेत. प्रत्यक्ष जे अशा मानसिक अवस्थेतून जात असतील त्यांची अवस्था काय होत असेल?'

• स्किझोफ्रेनिया अवेरनेस असोसिएशनच्या (सा) मानसिक आजारी व्यक्तींसाठीच्या पुनर्वसन केंद्राच्या प्रमुख आणि अनुभवी मानसोपचार तज्ज्ञ सौ. सारिका चांडक म्हणतात – 'सा'च्या केंद्रामध्ये अनेक रुग्ण 'सा'च्या बसने येतात. 'सा'च्या बसवर 'सा'चे नाव, पत्ता आणि इतर माहिती रंगवलेली आहे. काही शुभार्थी/रुग्ण त्यांच्या घराजवळच्या स्टॉपवर बस न पकडता

वाघ जखमी झाला तरी तो आयुष्याला कंटाळत नाही. तो थांबतो, वेळ जाऊ देतो, अन् पुन्हा एकदा बाहेर पडतो घेऊन तीच दहशत अन् तोच दरारा!

पुढच्या स्टॉपवर बस पकडतात. आपल्या घराजवळ बसमध्ये बसलो तर इतरांना लक्षात येईल की, हा/ही मानसिक आजारी व्यक्तींसाठी असलेल्या संस्थेत जाते. शुभार्थींना जेव्हा शेजारी-पाजारी विचारतात की, दिवसा तुम्ही कोठे जाता. तेव्हा त्यांचे उत्तर असते की, 'आम्ही नोकरीला जातो'.




वरील सर्व उदाहरणे हेच दाखवतात की, मानसिक आजाराविषयीचा कलंक ही एक केवळ काल्पनिक किंवा अनावश्यक फुगवून सांगितलेली गोष्ट नसून, एक खरोखरची समस्या आहे आणि म्हणूनच बंगलोर येथील निम्हांस संस्थेच्या मनोविकार विभागातील भूतपूर्व प्राध्यापक डॉ. श्रीनिवास मूर्ती म्हणतात,- मानसिक आजाराभोवतालच्या सर्वच जागा (space) - रुग्ण, कुटुंबीय, उपचार तज्ज्ञ, रुग्णालये इ. कलंकित झाल्या आहेत.

कलंकित होण्याचा हा दृष्टीकोन केवळ भावनिक अथवा वैचारिक पातळीवर न राहता कलंकित होण्याच्या भावनेमुळे रुग्ण उपचार सुरू करायला उशीर करतात, संपूर्ण उपचार घेत नाहीत, सतत कमीपणाची भावना/ताण घेऊन जगत राहतात आणि रिकव्हरी अर्थात सुधारणेसाठी योग्य तो पर्याय निवडू शकत नाहीत. कुटुंबीय देखील अशाच प्रकारचा ताण घेऊन जगतात. व्यक्तीगत आणि सामाजिक पातळीवर त्यामुळे मोठे नुकसान होते.

समाजातील हा स्टिग्मा कमी व्हावा असे अनेकांना मनापासून वाटते. परंतु कुटुंबातील कोणालाही आजार नसला तरी एक सर्वसामान्य व्यक्ती म्हणून काय करता येईल याचे ज्ञान अनेकांना नसते. स्टिग्मा कमी करण्यासाठी खूप काही तज्ज्ञ, समाजसेवक अथवा सामाजिक कार्यकर्ता असण्याची मुळीच आवश्यकता नाही. स्टिग्मा कमी करण्याच्या या उपक्रमात सर्वसामान्य कोणीही व्यक्ती सहभागी होऊ शकते किंबहुना सर्वसामान्य व्यक्तीच खराखुरा बदल घडवून आणू शकतात. स्टिग्मा कमी करण्यासाठी सर्वसामान्य व्यक्तींना कोणकोणत्या गोष्टी करता येतील ते आपण आता बघू.

**१. व्यक्ती आणि व्यक्तीचा आजार या गोष्टी वेगळ्या आहेत हे लक्षात घ्या.**

याचा अर्थ असा की, मानसिक आजार हा त्या व्यक्तीचा एक भाग आहेत. ती व्यक्ती, तिचे अस्तित्व, गुण-दोष हे त्याहूनही खूप काही आहे. व्यक्तीशी वागताना तिचे हे पैलू लक्षात घेणे आवश्यक आहे. मानसिक आजार हे तिचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व नव्हे. व्यक्तीचा मानसिक आजार हा कॅन्सर, डायबेटीस अशा शारीरिक आजारासारखाच आजार आहे हे लक्षात घ्या. मधुमेह आणि कर्करोग या आजारांबद्दल आपण स्टिग्मा बाळगत नाही. मानसिक आजारी रुग्णांना अनेक वेळेला लेझी, सायको, पागल अशी लेबल्स अथवा stereotypes दिली जातात/चिकटविली जातात. त्या लेबल्समध्ये अभिप्रेत असणारे पैलूच त्यांचे व्यक्तिमत्त्व ठरवतात असे अनेकांना वाटते. थोडक्यात; रुग्णाचा व्यक्ती हा घटक लक्षात घेऊन तिच्यातील सकारात्मक बाजूकडे लक्ष देऊन प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**२. ज्ञान मिळवा.**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातीलआणि मानसिक आरोग्यासाठी काम करणाऱ्या 'सहज' संस्थेची अध्यक्ष मीनाक्षी म्हणते,- स्टिग्माशी मुकाबला केवळ आवाज चढवून अथवा आक्रमक भूमिका घेऊन होणार नाही. त्यासाठी

स्वत:ला माहिती होणे आणि स्वत:ची खात्री पटणे आवश्यक आहे. काळाच्या ओघात अनेक समज-गैरसमज ऐकून अथवा वाचून तयार झालेले असतील ते समजावून घ्या. तुमच्या बोलण्यातून, शांत बसण्यातून ते तुम्ही प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षपणे पसरवण्याचे काम करत असता. ही साखळी तोडण्याचे काम तुम्ही करू शकता. आपल्या मनात गैरसमज कोणते आहेत आणि सत्य परिस्थिती काय आहे हे जाणून घेतले तर स्टिग्मा दूर करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान आणि कौशल्ये मिळतील आणि मनापासून प्रयत्नपण होतील.

**३. सामावून घ्या. अनेक गोष्टी एकत्र मिळून करा.**

मानसिक आजाराचे मोठे प्रमाण लक्षात घेता आपल्या अवती भोवती मानसिक आजारी व्यक्ती असणे सहज शक्य आहे. मग लक्षणे जास्त तीव्र असोत अथवा सौम्य असोत. अशा रुग्णाकडे अति संशयाने, अति उत्सुकतेने किंवा तिरस्काराच्या नजरेने पाहणे टाळा. 'सा' मधील एक ज्येष्ठ स्वयंसेविका सौ. नीलिमा बापट म्हणतात,- रुग्णाशी पहिली भेट/नजरभेट फार महत्त्वाची. त्याला/तिला चारचौघांसारखेच वागवा. तू आता कसा आहेस, काय झाले होते तुला, सध्या काय करतोस असे प्रश्न टाळा. किंबहुना या प्रश्नांवर उत्तर नसल्यामुळेच रुग्ण हा लोकांमध्ये मिसळण्याचे टाळत असतो. रुग्णाला आजार नाहीच आहे इतक्या सहजतेने तिच्याशी वागणे आणि विश्वास दाखवणे आवश्यक आहे.

**४. माध्यमांतील स्टिग्मा वाढवणाऱ्या गोष्टी समजावून घ्या.**

संशोधन असे सांगते की, अनेक लोक माध्यमांच्या द्वारे म्हणजे इलेक्ट्रॉनिक अथवा छापील माध्यमे यांच्याद्वारे स्वतःची मते बनवतात. माध्यमांच्या द्वारे अनेक वेळेला विषय सेन्सेशनल पद्धतीने हाताळला जातो. उदाहरणार्थ मनोरुग्णाकडून हिंसाचार अथवा धुमाकूळ, अशा हेडिंगची बातमी वाचली तर मुळातच आपल्या मनात असलेला पूर्वग्रह / गैरसमज हा दृढ व्हायला मदत होईल. अशा प्रकारची बातमी वाचनात आली तर ती तपासून बघणे आवश्यक आहे. ती एक घटना आहे अशा पद्धतीने बघणे आवश्यक आहे. त्यातील दोन गोष्टींचा म्हणजे मानसिक आजारी व्यक्ती आणि हिंसाचार यांचा नेहमीच संबंध असतो असा विचार करण्याची आवश्यकता नाही. ज्या ठिकाणी मनोरुग्णाचा कोणताही संबंध नाही अशा हिंसाचाराच्या अनेक घटना अवतीभवती घडत असतात, छापून येत असतात हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

**५. नेतृत्व करा /पुढाकार घ्या/रोल मॉडेल व्हा.**

बहुतेक वेळेला आपल्या आसपासचे लोक माहिती नसल्यामुळे अथवा गैरसमजांमुळे स्टिग्मा वाढवणाऱ्या गोष्टी करत असतात. तुमच्या स्वत:च्या कृतीतून स्टिग्मा कमी करणारे दृष्टीकोन आणि कृती यांचा अवलंब तर कराच, परंतु आपले कुटुंबीय, मित्र, सहकारी, शेजारी यांना देखील स्टिग्मा कमी करण्याची आवश्यकता आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची दिशा नम्रपणाने पटवून द्या. स्टिग्मा एकदम जाणार नाही. पुन्हा-पुन्हा सांगणे/प्रयत्न करणे महत्त्वाचे! ऑस्ट्रेलियातील सेन (Sane) ही संस्था स्टिग्मा दूर करण्याच्या कामातील जगातील एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेचे म्हणणे आहे की, स्टिग्मा कमी करण्यासाठी स्वस्थ बसू नका. माध्यमांमध्ये स्टिग्मा वाढवणाऱ्या बातम्या येत असतील तर त्याच्या संपादकांना, निर्मात्यांना अथवा चालकांना तुमचे म्हणणे लिहून कळवा. तरच बदलांना सुरवात होऊ लागेल.

**६. स्वत:विषयी असलेल्या कलंकित भावनेला थारा देऊ नका.**

रुग्ण हे समाजाचेच एक अंग असल्यामुळे समाजाचे चांगले-वाईट दृष्टीकोन रुग्णाने देखील धारण केलेले असतात. बहुतेक रुग्णांमध्ये स्वत:विषयी, स्वत:च्या

आजाराविषयी आणि उपचारांविषयी कलंकपणाची भावना असते ज्यामुळे ते लोकांमध्ये मिसळण्याचे टाळतात आणि सतत कमीपणाची भावना घेऊन जगतात. यालाच 'सेल्फ स्टिग्मा' असे म्हणतात. रुग्णाच्या रिकव्हरीच्या मार्गातील ही एक मोठी धोंड आहे. सिंधुदुर्गच्या 'सहज' संस्थेचा सभासद मंदार म्हणतो.- समाजाने हीन भावना न ठेवता आपल्या जाणिवा विस्तृत केल्या पाहिजेत. मानसिक आजारी व्यक्तीने देखील समजाच्या अशा वागण्याचे दुःख अथवा कमीपणा वाटून न घेता जिद्दीने सुधारणा करत राहिले पाहिजे. ग.दि.मांचे एक गीत मला आठवते - ...एका तळ्यात होती बदके पिले सुरेख .... त्याचे त्या कळले तो राजहंस एक. 'मी एक राजहंस आहे' असा विचार करून रुग्णाने वाटचाल केली पाहिजे. स्वतःला एक राजहंस समजून मंदार स्वतःच्या 'सेल्फ स्टिग्मा'ला तोंड देतो.

**सा चा स्टिच-50K उपक्रम :**

कलंकपणाच्या भावनेमुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाज अशा विविध पातळ्यांवर नुकसान होते. स्टिग्मा हा एक टाळता येणारा घटक आहे आणि तो घालवण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले गेले पाहिजेत. याच हेतूने 'सा' ने स्टिच (Stitch) हा उपक्रम आखला आहे. स्टिग्मा संदर्भात लोकांचे प्रबोधन करणे आणि प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. स्टिग्माचे स्वरूप, स्टिग्माची व्याप्ती, स्टिग्माचे परिणाम सांगून लोकांना मानसिक आजाराविषयी असलेला स्टिग्मा किती खोलवर समाज-मनात रुतलेला आहे हे दाखवून स्टिग्मा निर्माण करणाऱ्या गोष्टींपासून त्यांना परावृत्त करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. शाळा-महाविद्यालतील विद्यार्थी, मानसिक आजारी व्यक्ती, तिचे कुटुंबीय आणि सर्वसामान्य लोक अशा सर्व गटांसाठी हा उपक्रम असेल. त्या त्या गटाच्या गरजेनुसार कार्यक्रमातील स्वरूप, आशय आणि सखोलता बदलेल.

**समारोप**

मानसिक आजार हे सर्वत्र आढळणारे असे आजार आहेत. साहित्य, संगीत, चित्रपट आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उत्तुंग काम केलेल्या भारतातील तसेच परदेशातील अनेक व्यक्तींनादेखील मानसिक आजाराला सामोरे जावे लागले आहे. असे असूनही मानसिक आजाराविषयी लोकांच्या मनात गैरसमज आणि कलंकपणाची भावना आजही मोठ्या प्रमाणावर आहे. कलंकपणाचे परिणाम गंभीर आहेत. बदलती कुटुंब व्यवस्था, जीवन शैली आणि बदलते समाजजीवन लक्षात घेता मानसिक आजारांमुळे निर्माण होणारा समाजावरील भार इतर आजारांशी तुलना करता सर्वात मोठा असेल ही धोक्याची सूचना जागतिक आरोग्य संघटनेने दिलेली आहे. साधनसंपत्ती कमी असलेल्या भारतासारख्या देशात कलंकपणाची भावना कमी करणे हा शासनाच्या धोरणाचा महत्त्वाचा भाग असावयास हवा. तुरळक प्रयत्न वगळता कलंक निर्मुलनासाठी संपूर्ण देशभरात फारसे काही झालेले नाही. कलंक निर्मुलनासाठी आज देशाला सर्वसमावेशक आणि सुसंघटीत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

(या लेखात वापरलेली पोस्टर्स पौर्णिमा कोटे यांनी काढलेली आहेत. रेवती करमरकर यांनी या लेखाच्या कामात मदत केली. या दोघी पुण्याच्या सर पशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मानसशास्त्राच्या विद्यार्थिनी असून 'सा' संस्थेबरोबर इंटर्नशिप करत आहेत.)

**- प्रा. डॉ. अनिल वर्तक**
उपाध्यक्ष, स्किझोफ्रेनिया अवेरनेस
असोसिएशन (सा), पुणे.
भ्रमणध्वनी : ९५०३७१०८५९
Email : avartakyahoo.com

●●●

एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला सल्ला देते म्हणजे ती व्यक्ती स्वतःला समजूतदार समजते असे नाही, तर त्या व्यक्तीला त्याच्या चुकांचा पूर्वानुभव असतो.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### स्वागतोत्सव

शाळेचा पहिला दिवस १७ जून. इ. ५वीच्या विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर यांनी विद्यार्थ्यांना शाळेबद्दल माहिती सांगितली व शिस्तीचे नियम सांगितले.

स्वागतोत्सवाचे औचित्य साधून इ.५वी ते ९वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून आलेल्या पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

### स्तुत्य उपक्रम

इ.६वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांकडून गतवर्षीची क्रमिक पाठ्यपुस्तके घेऊन ती गरजू विद्यार्थ्यांना देण्याचा नवीन उपक्रम यंदापासून घेण्यात आला.

### निबंध स्पर्धा

अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पोलिस आयुक्तालय ठाणे यांचे तर्फे निबंधस्पर्धा घेण्यात आली. निबंधाचा विषय होता 'अंमली पदार्थांचे दुष्परिणाम'.

सदर कार्यक्रमासाठी मान. हेमलता शेरेकर (पोलिस निरीक्षक), मान. अविनाश सोंडकर (पोलिस निरीक्षक), रोशन जाधव (पोलिस हवालदार), तसेच पाच सहकारीही उपस्थित होते.

### जागतिक योग दिन

जागतिक योग दिनानिमित्त इ. ६वी व ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या संस्थेतर्फे योगासन प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नगरसेविका सौ. मढवी व श्री. राजेश मढवी तसेच आमदार सन्माननीय संजयजी केळकर साहेब उपस्थित होते.

मान. कवियित्री गावीत व मान. श्री. गणेश बडवे (वरीष्ठ अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियंत्रण नियमावली, घ्यावयाची दक्षता, सिग्नल-हेल्मेट यांचे महत्त्व सांगितले.

### शैक्षणिक चित्रपट

दि. ८ जुलै रोजी इ. ५वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'चिंटूची धमाल' हा चित्रपट, तर इ.९वी १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'बे एक बे' हा चित्रपट दाखविण्यात आला.

### शिक्षक-पालक संघ

दरवर्षीप्रमाणे यंदाही इ.५वी ते १०वीच्या सर्व पालकप्रतिनिधींमधून शिक्षक-पालक संघाची स्थापना करण्यात आली.

### गुरुपौर्णिमा

इ.५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली.

इ. ७वीच्या सर्व वर्गांसाठी एकांकिका नाट्य दाखवण्यात आले.

इ.९वीच्या विद्यार्थ्यांसाठी शिवसमर्थ शाळेच्या विज्ञान शिक्षिका सौ. शिल्पा टेंबे, तसेच श्री. दातार गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रसंगी विद्यार्थ्यांनी गुरूचे महत्त्व सांगितले.

---

१० वी साठी आयोजित केलेल्या कार्यक्रमास शाळेचे माजी मुख्याध्यापक मान. श्री. चिटणीस सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर सर्व कार्यक्रमांचे आयोजन, नियोजन विद्यार्थ्यांनीच केले.

**व्याख्यान**

दि. १८ जुलै रोजी इ.१०वी अ व बच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. सुधाकर आगरकर यांनी 'आवर्तसारणी – महत्त्व आणि उपयोजन' याबद्दल मार्गदर्शन केले. सदर संकल्पना अगदी सहज व सुलभ पद्धतीने विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

विविध शास्त्रज्ञ व थोरांची चरित्रे वाचल्यास आपणास प्रोत्साहन मिळते असे सांगून त्यांनी अशी चरित्रे वाचण्याचा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

**विज्ञान प्रकल्प**

चायना मकाऊ येथे झालेल्या ३४ व्या आंतरराष्ट्रीय किशोरवयीन विज्ञान प्रदर्शनात कु. प्रज्ञा मोरे व कु. सेजल रांगळे यांनी सादर केलेल्या 'ॲनेमिया आजारावर नियंत्रण' या प्रकल्पास तिसऱ्या क्रमांकाचे कांस्यपदक प्राप्त झाले. सदर प्रकल्पास सौ. उज्ज्वला धोत्रे व डॉ. श्री. अभिजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

**संस्कारभारती**

संस्कारभारती कोकण प्रांत विभागातर्फे तसेच बालविभाग व मातृशक्ती विभागातर्फे दर शनिवारी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत विद्यालंकार सभागृहात इ.६वी ड व इ च्या विद्यार्थ्यांसाठी संस्कारवर्गांचे आयोजन होते. ललित कलांच्या माध्यमातून मुलांवर हसत-खेळत संस्कार करणे हे या वर्गाचे उद्दीष्ट आहे.

सदर वर्ग मातृशक्ती विभाग प्रमुख सौ. सुमेधा बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले जातात.

शिक्षण परिषद केंद्र, वेहेळ (भिवंडी), जिल्हा परिषद शाळा, दिवे (अंजूर) येथे १०० शिक्षकांच्या उपस्थितीत शाळेतील शिक्षिका सौ. साधना जोशी यांच्या 'कवितेच्या वाटेवर' या कार्यक्रमाचे पहिले पुष्प गुंफले गेले.

**निसर्गमंडळ**

दरवर्षीप्रमाणे यंदाही इ.७वीच्या विद्यार्थ्यांचे निसर्गमंडळ स्थापन झाले. यावर्षी हे निसर्गमंडळ पर्यावरण दक्षता मंच आणि लायन्स क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्याद्वारे संचालित केले जाणार आहे. अशा या निसर्गमंडळाचा उद्घाटन सोहळा शनिवार दि. २७ जुलै रोजी मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी लायन्स क्लब सदस्य व पर्यावरण दक्षता मंचचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रसंगी श्री. शाम घाटे यांचे पक्ष्यांवरील दृक्-श्राव्य व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. विज्ञान शिक्षिका सौ. अडसुळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**शैक्षणिक वर्ष २०१९ ची सुरवात अतिशय उत्साहात झाली. जून, जुलै महिन्यातील उपक्रमांची माहिती.**

• शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख म्हणून सौ. अपर्णा वरुडकर यांनी कार्यभार स्वीकारला.

• १५ जून २०१९ – नर्सरी विभागात प्रवेश घेतलेल्या मुलांचे पालक, ज्यूनियर व सिनीयर मधेही नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पालक या सर्वांसाठी 'गार्गी सभागृहात' परिचयात्मक सभेचे आयोजन केले होते.

या सर्व पालकांना सौ. अपर्णा वरुडकर यांनी विद्या प्रसारक मंडळ व त्यांच्या विविध संस्थांची ओळख करून दिली. सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्रगतीचा आलेख, शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना सचित्र करून देण्यात आली. यानंतर कोकम सरबताचा आस्वाद घेऊन पालकांनी पूर्व प्राथमिक विभागाचे वर्ग व शिक्षक यांना भेट दिली.

• १७ जून २०१९ – नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांच्या शाळेचा पहिला दिवस उत्साहात पार पडला. नवीन शाळा, नवीन वर्ग, शिक्षक या सर्वांशी मुलांनी छान जुळवून घेत शाळेच्या पहिल्या दिवसाचा आनंद लुटला.

• ११ जुलै २०१९ – आषाढी एकादशी दरवर्षी आमच्या चिमुकल्यांच्या दिंडीसाठी एका सामाजिक विषयाची निवड केली जाते. यावर्षी परिसर स्वच्छता – ओला व सुका कचरा हा विषय होता. नर्सरी, ज्यूनियर व सिनीयर या तिनही विभागातून एक / एक विठोबा / रखुमाईच्या वेशातील मुले मधे उभी राहिली. त्यांच्या भोवती विठ्ठलाची गाणी म्हणत छोट्या वारकऱ्यांची दिंडी स्वच्छतेची गाणी म्हणत, विठूरायाचा गजर करत होती.

सिनीयरच्या ३/४ मुलांनी ओला कचरा निळ्या डब्यात व सुका कचरा हिरव्या डब्यात टाका, परिसर स्वच्छ ठेवा असे आपल्या मित्रांना सांगितले. याच संदर्भातील फलक, तक्ते यांच्या आधारे थोडक्यात मुलांनी ही माहिती दिली. दुधीच्या वडीचा प्रसाद आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुलांना देण्यात आला.

• २९ जून व २० जुलै २०१९ – मासिक पालक सभा. दर महिन्याचा अभ्यासक्रम व मुलांच्या प्रगतीची माहिती देण्यासाठी दर महिन्याला पालक सभा आयोजित केली जाते. २९ जून व २० जुलै रोजी पूर्व प्राथमिक विभागाची गटानुसार पालक सभा घेण्यात आली.

२९ जून रोजी झालेल्या पालक सभेत प्रत्येक गटाचा एक याप्रमाणे पालक प्रतिनिधींची निवड प्रक्रिया पार पडली व या पालक प्रतिनिधींची विभाग प्रमुखांबरोबर २० जुलै रोजी पहिली सभा झाली.

**प्राथमिक विभाग**

दि. २१ जून २०१९ रोजी जागतिक योग दिवस म्हणून सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो.

इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक योगिक आसने व प्राणायामाचे प्रकार विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखवून करून घेतले. दैनंदिन जिवनात योग केल्याचे महत्त्व व फायदे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

दि. २५ जून २०१९ रोजी श्रीमती रोशन जाल पटेल मॅडम यांच्या स्मरणार्थ इ.१ ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यमिक शाळेच्या प्राथमिक विभागातून इ. १ ली ते ४ थी विद्यार्थ्यांचे या परीक्षेत तब्बल अठ्ठावीस विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून गोल्ड मेडल पटकावले.

या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व त्यांना पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा देत शाळेने त्यांचे खूप कौतुक केले. विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे

**उत्कृष्ट कामगिरी**

| अनु. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कु. देवयानी अजित यादव | १ ली | ८९ |
| २ | कु. अनिका आशुतोष गोळे | १ ली | ८६.२५ |
| ३ | कु. कार्तिकी जगदीश शिंदे | १ ली | ८६ |
| ४ | कु. आराध्या मंगेश भोसले | १ ली | ७८ |

हरण्याची काळजी अन् जिंकण्याची महत्त्वाकांक्षा न बाळगता प्राणपणाला लावून लढावं म्हणजे विजय तितकाच आनंददायी होतो आणि पराभव झालाच तर तो तितकासा बोचत नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | कु. अनन्या अभय वाळिंबे | १ ली | ७७ |
| ६ | कु. श्रीनिधी एन. एस. फडके | २ री | ७९.८ |
| ७ | कु. इरा समीर नेसरीकर | ३ री | ८७ |
| ८ | कु. अर्णव अभिजित दामले | ३ री | ८५.५ |
| ९ | कु. धन्विन ज्ञानदेव अडकर | ३ री | ८१ |
| १० | कु. वरदा आशिष गानू | ४ थी | ९३ |
| ११ | कु. विराज हृषिकेश ताम्हणकर | ४ थी | ९२.५ |
| १२ | कु. यश महेश कर्णिक | ४ थी | ८७ |
| १३ | कु. मुग्धा प्रकाश घाग | ४ थी | ८२ |

**अधिकतम गुणवत्ता**

| अनु. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कु. वियान जयेश डोके | १ ली | ७४.७५ |
| २ | कु. मृण्मयी मंदार रानडे | १ ली | ७२.२५ |
| ३ | कु. श्रवण महेंद्र देशमुख | १ ली | ६८ |
| ४ | कु. वेदांती हर्षल मानकामे | १ ली | ६५.७५ |
| ५ | कु. कनिष्क ओंकार पाटील | १ ली | ६४ |
| ६ | कु. श्रीशा शैलेश देशमुख | १ ली | ६२.२५ |
| ७ | कु. इशिता विशाल कान्हेरे | १ ली | ५७ |
| ८ | कु. सम्यक अभिजित ठोंबरे | २ री | ७१.३ |
| ९ | कु. सुमेध मनिष वेलणकर | २ री | ७०.३ |
| १० | कु. अर्णव राहुल रावल | २ री | ६९.५ |
| ११ | कु. देवदत्त मयुरेश भोमे | २ री | ५८.५५ |
| १२ | कु. अर्णव मंदार रानडे | ४ थी | ७४.२५ |
| १३ | कु. मिहीर श्रीनिवास गाडगीळ | ४ थी | ७०.७५ |
| १४ | कु. आर्या निरंजन वैशंपायन | ४ थी | ६५.६ |

**गुणवत्ता**

| अनु. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कु. आर्या अनंत दाभेकर | ३ री | ५३.२५ |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**मानवी कल्याण हाच कलेचा हेतू : पद्मश्री डॉ. वामन केंद्रे**



दि. १९ जुलै, २०१९ रोजी ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे १९ वे पुष्प ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. वामन केंद्रे यांनी 'जीवन आणि नाटक' या विषयावरील व्याख्यानाने गुंफले. ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशात मोलाची भर घालणाऱ्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्वर्यू राहिलेल्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या तपस्वी जीवनाला श्रद्धांजली म्हणून ही व्याख्यानमाला जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केली आहे. या प्रसंगी डॉ. वामन केंद्रे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'युवशिल्प' या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी ज्येष्ठ नाटककार अतुल पेठे यांच्या नवनिर्मितीचे बोन्साय होण्याच्या काळात या लेखाचा उल्लेख करत एकूणच भारतीय रंगभूमीच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. या वेळी युवाशिल्पचे संपादक

प्रा. संतोष राणे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. वामन केंद्रे आपल्या जीवन आणि नाटक या विषयावरील व्याख्यान देताना म्हणाले की, भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथात नाटकाच्या सादरीकरणासोबतच त्याच्या प्रयोजनाबद्दलही स्पष्ट उल्लेख आहेत. रसिकप्रेक्षकांना मिळणारी सौंदर्यानुभूती हा नाटकाचा खरा परिपाक आहे. ते म्हणाले की 'ज्याच्या जगण्यात नाटक नाही त्यासारखा सपक जीव या धरतीवर नाही'.

डॉ. केंद्रे पुढे म्हणाले की, आपलं जगणं एकसुरी होत असून त्या चाकोरीबद्ध जीवनाच्या पलीकडे मानवी संवेदनांना नेणं हेच नाटकाचं काम आहे. साहित्य, संगीत, कला, नाटक याची जाण नसणाऱ्या समाजाचे कितीही आर्थिक उत्थान झाले तरी सर्वांगीण विकास होत नाही. जीवन हे क्षणिक आहे व एकदाच मिळाले आहे या पाश्चात्य वैचारिक धारणेतून समाजाला लागलेली सुख ओरबाडण्याची सवय घातक आहे. यावर उपाय भारतीय परंपरेतच आपणास सापडतो असे ते म्हणाले.

मानवी कल्याण हाच कलेचा हेतू असून समाजात वाढत चाललेले सवंगीकरण हा मोठा चिंतेचा विषय आहे असे ते म्हणाले. स्वतःवर निर्भेळपणे हसू शकणे हे चांगल्या समाजाचे लक्षण आहे.

महाराष्ट्रात जेवढं नाटकावर प्रेम करण्यात येतं तेवढं सहसा कुठेच होत नाही असे डॉ. केंद्रे आवर्जून म्हणाले. रोज नवा उत्सव म्हणजे नाटक असं म्हणत आपल्या 'झुलवा','रणांगण','मध्यमव्ययोग', 'मोहें पिया' आदी नाटकांचे संदर्भ डॉ. केंद्रे यांनी आपल्या व्याख्यानात दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले तर संयोजन वृत्तविद्या विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## मुंबई विद्यापीठ युवक महोत्सव



५१ व्या मुंबई विद्यापीठाच्या युवक महोत्सवाचे बक्षीस वितरण दि. २३ जुलै २०१९ रोजी संपन्न झाले. जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे बक्षीसे मिळाली.

1. Trophy for Overall Championship in zone.
2. Trophy for best Folk dance (1st Prize) among all colleges participated under University of Mumbai.
3. Troply for best performance (1st prize) in Fine Arts among all colleges participated under University of Mumbai.

## कारगिल विजय दिवस



दिनांक २६ जानेवारी हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. यावर्षी महाराष्ट्र सरकारने कारगिल विजय दिवसाचे औचित्य

जीवनात अनंत अडचणी असतात, पण ओठांवर हास्य ठेवा, कारण कोणत्याही परिस्थितीत जगायचं तर असतंच. मग हसत हसत जगण्यात काय नुकसान आहे?

साधून युवक वर्गामध्ये राष्ट्रभक्ती दृढ करण्यासाठी 'उरी –द–सर्जिकल स्ट्राइक' हा चित्रपट संपूर्ण राज्यात मोफत दाखवण्याचे ठरवले.

त्याच अनुषंगाने जोशी–बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवस साजरा करण्यासाठी सहभाग घेतला.

कला आणि वाणिज्य विभागातील एकूण २३६ विद्यार्थी 'उरी–द सर्जिकल स्ट्राइक' हा चित्रपट पाहण्यासाठी सकाळी १० च्या वेळेदरम्यान आनंद थिएटर, कोपरी, ठाणे येथे गेले.

चित्रपटाची संकल्पना व उद्दिष्ट विद्यार्थ्यांपर्यंत खूप सोप्या भाषेत पोहोचवण्यात आले, तसेच सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय शांतीपूर्वक संपूर्ण चित्रपट पाहिला व काही विद्यार्थ्यांनी आपल्या भारतीय जवानांच्या कर्तृत्वाबद्दल प्रतिक्रियाही व्यक्त केल्या व आपल्या राष्ट्र भक्तीचा रंगही दाखवून दिला.

सर्व विद्यार्थ्यांसोबत प्रा. स्वप्नील नं. मयेकर हे होते, तसेच प्रा शिवाजी नाईक, प्रा. स्वाती भालेराव तसेच उप–प्राचार्य प्रा. प्रियंवदा टोकेकर यांचे सहकार्य होते व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शनही लाभले.

**विद्यार्थ्यांनी चित्रपटसाक्षर झालं पाहिजे : सुधीर नांदगावकर**



२७ जुलै रोजी जोशी बेडेकर फिल्म सोसायटीच्या वतीने नो मॅन्स लँड या २००१ साली ऑस्कर पारितोषिक प्राप्त झालेल्या चित्रपटाचे सादरीकरण झाले. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष व ज्येष्ठ चित्रपट समीक्षक श्री. सुधीर नांदगावकर याची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी फिल्म सोसायटीतर्फे दाखवण्यात येणाऱ्या नवनवीन चित्रपटाचे शास्त्रीय विश्लेषण करून सहृदय प्रेक्षक घडवण्यात योगदान करण्याचे आवाहन केले. ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष श्री. सुधीर नांदगावकर यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. जोशी बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटी ही ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशात मोलाची भर घालणारी सोसायटी असून डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षे अविरतपणे काम करत आहे असे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले. एकूणच भारतीय चित्रपटाचे ऑस्करसाठी नामांकन होताना व अंतिम फेरीत ऑस्कर मिळताना नेमक्या कुठल्या बाबी लक्षात घेण्यात येतात या संदर्भात श्री. नांदगावकर यांनी भाष्य केले. डेनिस टोनोव्हीक यांनी दिग्दर्शन केलेला २००१ साली ऑस्कर मिळालेला नो मॅन्स लँड या चित्रपटाला ऑस्कर का मिळाले याची त्यांनी चिकित्सा केली.

हा चित्रपट बॉसनिय व सरबिया या दोन राष्ट्रांमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारित असून एकमेकांचे कट्टर शत्रू असलेल्या सर्बिया व बॉसनिया या राष्ट्रांचे दोन सैनिक एका खंदकात अडकतात व त्यांच्या जीवावर बेतलेल्या या प्रसंगातून युद्धाची चिकित्सा करतात. यु एन च्या शांतिसेनेच्या कार्यप्रणालीवर देखील हा चित्रपट भाष्य करतो. या युद्धाचे वार्तांकन करणारी लिव्हिंगृन नावाची महिला पत्रकार सर्वांचे लक्ष वेधून घेते. एकूणच युद्धाने कुठलेच प्रश्न सुटत नाहीत असा सल्ला हा चित्रपट देऊन जातो.

चित्रपटाचे सादरीकरण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी चित्रपटाबद्दल आपले मत व्यक्त केले. फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी विल्फ्रेड ओवेन या कवीच्या स्ट्रेंज मिटींग या कवितेचा दाखला देत चित्रपटाच्या युद्धविषयक काही प्रसंगांवर भाष्य केले.



या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, ग्रंथपाल नारायण बारसे, जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील, तसेच बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहन पिंगळे यांनी केले.

**विद्या प्रसारक मंडळाचा ८४ वा वर्धापन दिन संपन्न**

**खरे शिक्षण व्यक्तिमत्त्व विकासात पाझरते : डॉ. विजय बेडेकर**



दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाचा ८४ वा वर्धापनदिन ठाणे कॉलेज परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व सचिव श्री. उत्तम जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी विद्या प्रसारक मंडळ संचलित सर्व शैक्षणिक संस्थाचा चालु शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करण्यात आला. डॉ. विजय बेडेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की,- शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार स्वायत्त शिक्षण या नव्या परिभाषेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे शैक्षणिक संस्थांवर जबाबदारी आली आहे. समाजाच्या बदलणाऱ्या गरजा समजून घेऊन पाऊले टाकणे क्रमप्राप्त झाले आहे. यासाठी आधुनिक व बदलत्या अभ्यासक्रमांना नव्याने सुरू करावे लागेल असा आशावाद डॉ. बेडेकर यांनी व्यक्त केला.

खऱ्या शिक्षणाची व्याख्या करताना डॉ. बेडेकर म्हणाले की,- शिक्षण व्यक्तिमत्त्व विकासात पाझरते. शिक्षक हा या संक्रमण प्रक्रियेत अत्यंत मोलाची कामगिरी बजावत असतो. विद्यार्थी नकळत अनेक गोष्टींचे निरीक्षण करतात व गुरुजनांकडे पाहून मानवी मूल्ये आत्मसात करत असतात. स्वतःचे आचरण आपल्या आचारात व विचारात स्थापन करणारा खरा आचार्य असतो असे डॉ. बेडेकर म्हणाले.

आज आपली स्पर्धा अमेरिकेशी नसून आपल्या शेजारील चीनशी आहे. आज चीनने धोरणांमध्ये आमूलाग्र बदल घडवत विकासात मुसंडी मारली आहे. भारतीय शैक्षणिक संस्था नेमक्या कुठे कमी पडतात याचे परीक्षण करण्याची वेळ आली आहे. आपण संभाषण कौशल्य व संशोधनात कमी पडतो अशी खंतही डॉ. बेडेकर यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मंडळ संचालित सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांसोबतच अनेक प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष राणे यांनी केले.

---

एवढे लहान बना की, प्रत्येक जण तुमच्यासोबत बसू शकेल आणि इतके मोठे बना की,
जेव्हा तुम्ही उभे राहाल तेव्हा कोणीही बसलेला नसेल!

## ठाण्यात मेगा करिअर काऊंन्सलिंगचे आयोजन....




दि. ०२/०८/२०१९ रोजी इन्स्टीट्यूट ऑफ चार्टड अकाउंटन्स ऑफ इंडिया ठाणे शाखे तर्फे जोशी बेडेकर कॉलेज ठाणे येथे मेगा करिअर काऊंन्सलिंगचे आयोजन आज करण्यात आले, या कार्यक्रमाला ३३४ विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. ICAI ठाणे शाखेचे अध्यक्ष सीए योगेश प्रसादे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. ICAI ठाणे शाखेबद्दल सर्वांना माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता ICAI ठाणे शाखेचे प्रतिनिधी RCM सीए कमलेश साबू यांच्या उत्स्फूर्त मार्गदर्शनपर भाषणाने सीए प्रोफेशन बद्दलचे महत्त्व पटवून देत सीए प्रोफेशनची आवड त्यांनी विद्यार्थ्यांमधे निर्माण केली.

या कार्यक्रमाला ICAI ठाणे शाखेचे समिती सदस्य सीए शिवभगवान आसावा आणि सचिव सीए राहुल घरत उपस्थित होते. तर जोशी बेडेकर कॉलेजतर्फे व्हाईस प्रिंन्सिपल दीक्षित मॅडम, ज्युनिअर कॉलेज सुपरवायझर शर्मा सर, ज्युनिअर कॉलेज कॉमर्स डिपार्टमेंट हेड वैद्य मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली, कॉलेज प्रिंन्सिपल नाईक मॅडम यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

## मुंबई विद्यापीठाचा ५२ वा युवामहोत्सव जोशी बेडेकर महाविद्यालयात संपन्न

विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ आयोजित झोन ४५२ वा युवा महोत्सव विद्या प्रसारक मंडळाच्या




जोशी बेडेकर महाविद्यालयात दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी संपन्न झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रतिभावंत कथक नृत्यांगना स्वाती सुर्वे-कोल्हे उपस्थित होत्या. युवा महोत्सव समन्वयक डॉ. मृण्मयी थत्ते, डॉ. अर्चना प्रभुदेसाई, मुंबई विद्यापीठाच्या डॉ. संगीता पांडे, डॉ. अंजली देशपांडे उपस्थित होत्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक प्रस्ताविकात आपले मत मांडताना युवा या शब्दाची विवेकानंदांना अभिप्रेत असलेली व्याख्या सांगत राष्ट्रनिर्माणासाठी युवकांनी रचनात्मक कार्य करण्याचे आवाहन केले. कुठलीही कला ही एक थेरपी अर्थात उपचार पद्धती असते असं सांगत सावरकरांच्या शब्दात जे जे उन्नत उदात्त मंगल असते त्याची उपासना केली पाहिजे. जोशी बेडेकर महाविद्यालय हे विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक पिंड घडवत असते आणि म्हणूनच मागच्या आठ वर्षांपासून युवा महोत्सवात अधिकाधिक पुरस्कार आपणास मिळतात असे डॉ. नाईक यांनी आवर्जून सांगितले. कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुण्या व ज्येष्ठ कथक नृत्यांगना स्वाती सुर्वे-कोल्हे म्हणाल्या की, भारतीय संस्कृती मध्ये १२ वर्षांच्या साधनेला 'तप' अशी संज्ञा देण्यात येते.

कलेचं पहिलं तप केल्यास प्रेक्षकांना आनंद देता येतो, पुढच्या तपानंतर स्वतःला आनंद मिळवता येतो, त्याच्या पुढच्या तपानंतर गुरूला आनंद देता येतो, तर आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यातील तपानंतर परमेश्वराला आनंद देता येतो. कलेच्या प्रांतात साधनेला मोठं महत्त्व

असून झटपट गोष्टी साध्य होत नाहीत असे स्वाती कोल्हे म्हणाल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष राणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मृण्मयी थत्ते यांनी केले. युवा महोत्सवासाठी ठाणे विभागातील सर्व महाविद्यालयांचे जवळपास २ हजार विद्यार्थी पूर्णदिवस महाविद्यालयात वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धांसाठी जल्लोषात उपस्थित होते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जुलै २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ जुलै : प्रा. महेश भानुशाली यांनी मेसर्स पीतांबरी प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सौरऊर्जा प्रतिनिधींसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम (एमडीपी) सत्राचे आयोजन केले.

८ जुलै: डॉ. व्ही. एन. ब्रिम्स येथे स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०१९ (हार्डवेअर संस्करण) च्या भव्य सांगता समारंभाच्या उद्घाटनाचे वेबकास्टिंग करण्यात आले.



१० ते १३ जुलै : प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी पी जी डी एम २०१९-२१ तुकडीच्या उद्घाटन समारंभाचे आणि फाऊंडेशन प्रोग्रामचे आयोजन केले. सुप्रसिद्ध लेखक श्री. राधाकृष्णन पिल्लाई यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. कृणाल के पुंजनी यांनी संकल्पित केलेल्या Creating - New You या विषय सूत्रावर आधारित ध्वनिचित्रफितीचे प्रक्षेपण देखील यावेळी करण्यात आले.



१६ जुलै : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सने सेल्फी विथ गुरू मोहिमेद्वारे गुरू पौर्णिमा साजरी केली.



२८ जुलै: डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी, प्रा. कृणाल के. पुंजानी तसेच श्री. वैभव पंडित यांनी कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसमवेत हरीयाली-मुलुंड या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निसर्ग संवर्धन दिन, २०१९ च्या निमित्ताने वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला.



•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.